अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, उस्मानाबाद, लातूर, विजापूर, गुलबर्गा, बिदर, बीड

www.surajyadigital.com | सोमवार, दि. २६ सप्टेंबर २०२२ ▸ वर्ष : २० वे ▸ अंक : ३५७ वा किंमत : ५ रुपये ▸ पाने ८

## भारताने तिसऱ्या सामन्यासह मालिका जिंकली



✔ **सुराज्य/हैदराबाद** : बलाढ्य ऑस्ट्रेलियावर आजच्या तिसऱ्या सामन्यात भारताने दणदणीत विजय साकारला. या विजयासह भारताने मालिकाही २-१ अशी जिंकली आहे. ऑस्ट्रेलियाने भारतापुढे विजयासाठी १८७ धावांचे आव्हान ठेवले होते. या आव्हानाचा पाठलाग करताना भारताला लोकेश राहुल आणि रोहित शर्मा यांच्या रुपात दोन धक्के बसले. पण त्यानंतर सूर्यकुमार यादव आणि विराट कोहली यांनी धडाकेबाज फटकेबाजी केली. त्यामुळेच भारताला या सामन्यात सहा विकेट्स राखून विजय मिळवता आली. सूर्याने यावेळी ६९ धावा केल्या, तर कोहलीने ६३ धावांची खेळी साकारली.

ऑस्ट्रेलियाच्या आव्हानाचा पाठलाग करत असताना भारताला पहिल्याच षटकात धक्का बसला. पहिल्या षटकाच्या अखेरच्या चेंडूवर लोकेश राहुल बाद झाला आमि भारताला मोठा धक्का बसला. त्यानंतर रोहित शर्माही आज मोठी खेळी साकारू शकला नाही आणि तो १७ धावांवर आऊट झाला. भारताचे दोन विकेट्स पडले असले तरी त्यानंतर सूर्यकुमार यादव मैदानात आला आणि त्याने सामन्याचे चित्रच बदलून टाकले.

### 'खाकी' वर्दीवरच्या संतापाचा राग निघाला

# गर्दीमधील तरुणांनी पोलीस अधिकाऱ्याच्या गालावर जाळ काढला

## पोलीस अधिकाऱ्याच्या पत्नीची छेड काढण्यावरून झाला राडा

## रात्री उशीरापर्यंत पोलीस चौकीत दावे - प्रतिदावे

✔ सुराज्य/सोलापूर

**आसरा चौक ते विजापूर रस्ता (व्हाया टिळक विद्यापीठ पाण्याची टाकी जाणारा मार्ग...) रात्रीचे साठेआठ वाजलेले... रस्त्यावर मोठी वर्दळ... पोलीस चौकीसमोर माणसांची गर्दी...वाहतुकीची कोंडी... भांडणाचा आवाज... रस्त्यावरचा प्रत्येकजण नेमकं काय झालं हे जाणून घेण्यासाठी पुढे सरसावत असलेला... बराच वेळ गोंधळ उडालेला... महिलांचा जोरजोरात आवाज ऐकू येऊ लागलेला... बऱ्याच वेळानंतर पोलीस आलेले... एक तरुण त्याचे आई –वडील आणि खाकीवर्दीमधील एक अधिकारी आणि त्यांच्या परिवाराला पोलिसांनी आत घेऊन दरवाजा लावत... उपस्थित जनसमुदाय हटवण्यासाठी खाकीवर्दीच्या भाषेत दम देणं सुरू ठेवलेलं.**

रविवारी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास जुळे सोलापूर परिसरातील डी मार्ट पाण्याच्या टाकी जवळच्या विजापूर नाका पोलीस ठाणे अंकित पोलीस चौकी आहे. या चौकीजवळ हा राडा सुरू होता. सोलापुरातील एमआयडीसी पोलीस ठाण्याकडे वरिष्ठ पोलीस अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या एका वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याची पत्नी या भागातील एका दुकानात खरेदीसाठी आलेल्या होत्या. खरेदीदरम्यान एका मुलाने त्यांची छेड काढली असे या पोलीस अधिकाऱ्यांचे म्हणणे होते. या अधिकाऱ्याच्या पत्नीने छेडछाडीचा हा प्रकार आपले पती घरी आल्यानंतर सांगितला. त्यावर हे पोलीस अधिकारी संतापले, आपल्या परिवाराला घेऊन जाब विचारण्यासाठी ते आले.

एका दुकानात जाऊन त्यांनी घडल्या प्रकाराबद्दल एका मुलास हटकले, तेव्हा या मुलाने वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्याला अरे - तुरेची भाषा केली. त्यावर चिडलेल्या या पोलीस अधिकाऱ्यांने त्या मुलाला बेदम मारहाण करायला सुरुवात केली असे उपस्थित नागरिकांचा खास करून रस्त्यावरील विक्रेते यांचे म्हणणे होते.

सुराज्य SPOT REPORT

छेडछाड केली नसताना, तरुणाला विनाकारण मारहाण केली म्हणून, भाजी अन् फळ विक्रेते शिवाय अन्य व्यावसायिक संतापले. या पोलीस अधिकाऱ्याला आणि त्यांच्या परिवाराला घेराव घातला, या दरम्यान येथे राडा सुरू झाला. बघ्यांची मोठी गर्दी जमली. विक्रेते आणि त्यांचे समर्थक मोठ्या संख्येने जमा झाले. यावेळी गर्दीमध्ये उपस्थितांपैकी काही तरुणांनी त्या अधिकाऱ्याला मारहाणही केली. संबंधित पोलीस अधिकारी सर्वांना घडला प्रकार सांगण्याचा प्रयत्न करत होते. पण चिडलेला जनसमुदाय ऐकून घेण्याच्या मनः स्थितीत बराच वेळ नव्हता.



### तर मी निघून जातो ...

ज्या पोलीस अधिकाऱ्याच्या पत्नीच्या बाबतीत छेडाछेडीचा प्रकार झाला होता, ते पोलीस अधिकारी उपस्थित जनसमुदायाला विशेषतः व्यावसायिकांना तसेच त्यांनी जमवलेल्या तरुणांना सांगण्याचा प्रयत्न करीत होते, माझ्या पत्नीच्या बाबतीत छेडछाडीचा प्रकार झाला आहे, तसाच प्रकार तुमच्या पत्नीच्या बाबतीत झाला असता, तर तुम्ही ते सहन केले असते का ? पोलीस अधिकारी म्हणून आम्हाला न्याय नाही का ? असे तो अधिक प्रांजळपणे म्हणत होता. माझे चुकीचे आहे असे सांगा, मी येथून निघून जातो असे ते पोलीस अधिकारी म्हणत होते. पण त्यांच्या या म्हणण्याकडे कोणी लक्ष देत नव्हते. उलट त्यांच्या अंगावर तरुण जात होते, या दरम्यान त्या पोलीस अधिकाऱ्याच्या तोंडावर गर्दीतून तरुणांनी चापटा मारल्या.

### विनाकारण मारहाणीचा आरोप

पोलीस अधिकाऱ्याच्या पत्नीची छेडछाड केली गेली नाही, ज्याच्यावर छेडछाडीचा आरोप झाला, तो तरुण छेडछाड करणाऱ्यापैकी नाही, तरी पण पोलीस अधिकाऱ्याने, आपल्या खाकीवर्दीच्या जोरावर त्याला विनाकारण मारहाण केली, त्या तरुणाची कोणतीही चूक नव्हती असा दावा फळ आणि भाजी विक्रेते तसेच अन्य व्यावसायिकांकडून या दरम्यान केला गेला.

भाजी आणि फळ विक्रेत्या महिला या पोलीस अधिकाऱ्याला शिवीगाळ करत होत्या. अंगावर मारण्यासाठी धावून येत होत्या.असा प्रकार बराच वेळ चालू होता. पोलीस अधिकारी आपल्या वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना या प्रकारासंदर्भात फोन लावून सांगत होता. या दरम्यान पोलीस चौकीतील पोलीस कोणीच उपस्थित नव्हते. भर रस्त्यावर हा गोंधळ सुरू होता. पुढे खूप वेळाने चौकीचे पोलीस तिथे धावले. रात्री उशीरापर्यंत चौकीत या संदर्भात दावे - प्रतिदावे सुरू होते.

### गुन्हा दाखल नाही

यासंदर्भात विजापूर नाका पोलीस स्टेशनला संपर्क साधला असता, तेथून अशी माहिती सांगण्यात आली की, रात्री झालेल्या भांडणाचा कॉल आमच्या पोलीस ठाण्याला आला होता.त्यावेळी आम्ही तात्काळ पोलिसांना पाठवून दिले. यासंदर्भात सध्या कोणत्याही प्रकारची तक्रार किंवा गुन्हा दाखल झाला नसल्याचे सांगण्यात आले.



## धर्मपुरीत अफवा बिबट्याची पण सापडला तरस

✔ **सुराज्य/वेळापूर** : माळशिरस तालुक्यातील धर्मपुरी येथे गेले तीन दिवसापासून बिबट्याचा वावर असल्याची शक्यता वर्तवण्यात येत असताना बारामती रेस्कू टिमला तरसला पकडण्यात यश आले आहे.

याबाबत धर्मपुरी ग्रामस्थांनी वनपरिक्षेत्र विभाग माळशिरस यांच्याकडे धर्मपुरी परिसरात बिबट्या अथवा सदृश प्राणी फिरत असल्याचे कळविल्याने लागलीच वनपरिक्षेत्र माळशिरस विभागाचे अधिकारी दयानंद कोकरे यांनी सर्व कर्मचाऱ्यासह जाऊन ज्या परिसरात सदृश प्राण्याचा वावर असल्याचा सांगण्यात आले. त्या परिसरात जाऊन पाहणी केली व सदृश प्राण्याचे ठसे मिळवण्याचा प्रयत्न केला व त्याचबरोबर ग्रामस्थांना जनावरांना कोणताही धोका होऊ नये म्हणून पिंजरा लावण्यात आला होता. बारामती रेस्क्यू टीमने जाळे लावून तिन्ही बाजूने कालवा चालू केल्याने सदर प्राणी तेथून घाबरून पळून जात असताना तो जखमी अवस्थेत जाळ्यात अडकला तरसाला त्या ठिकाणी भुलीचे इंजेक्शन देऊन जखमी पायावर औषधोपचार केले.

## लग्न का करून देत नाही म्हणून बहिणीला मारहाण

✔ सुराज्य/सोलापूर

लग्न का करून देत नाही म्हणून शिवीगाळ करत बहिणीच्या डोक्यात भाजीपाला कापण्याची विडी घालून जखमी केल्याची घटना दि. २२ सप्टेंबर रोजी सकाळी नऊ वाजण्याच्या सुमारास किसान संकुल जुना विडी घरकुल येथे घडली.

याप्रकरणी शबाना रफिक हेब्बाळ (वय-४०, रा. किसान संकुल जुना विडी घरकुल) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून समीर शेख याच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

फिर्यादी या त्यांच्या घरात नाश्ता बनवत असताना फिर्यादी यांचे वडील, भाऊ व बहीण असे नाष्टा करीत होते. त्यावेळी फिर्यादी शबाना यांचा लहान भाऊ समीर हा तेथे येऊन लग्न का करून देत नाही या कारणावरून फिर्यादीच्या वडिलांना शिवीगाळ करत लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर वडील व बहीण भांडण सोडविण्यासाठी मध्ये आले असता, त्यांना देखील लाथा बुक्क्यांनी मारहाण करून दमदाटी केली व फिर्यादी शबाना यांना किचन मधून बाहेर ढकलत फळभाज्या कापण्याची विळी घेऊन डोक्यात मारली आहे. असे फिर्यादीत म्हटले आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस नाही कांबळे हे करीत आहेत.



नवरात्रीनिमित्त रूपाभवानी मंदिरात चांदीचा लेप लावताना कर्मचारी.

## अज्ञात वाहनाच्या धडकेत एक ठार

✔ **सुराज्य/सोलापूर** : पेट्रोल पंपावरील काम आटपून दुचाकीवरून आपल्या घराकडे निघालेल्या कर्मचाऱ्याच्या दुचाकीस अज्ञात वाहनाने धडक दिल्याने डोकीस मार लागून कर्मचारी उपचारापूर्वीच झाला.

या घटनेच्या हकिकत अशी की, तामळवाडीतील राजाराम पेट्रोल पंप मध्ये काम करत असलेला कर्मचारी सुरेश काशिनाथ चौधरी (वय- २५ रा. मित्र नगर, शेळगी) हे आपले काम आटपून सायंकाळी साडेपाच वाजता सुमारास घराकडे येत असताना तुळजापूर रोडवरील कचरा डेपो समोर असलेल्या चव्हाण फर्निचर या शोरूम समोर पाठीमागून आलेल्या अज्ञात वाहनाच्या वाहनाने त्याच्या मोटरसायकल क्रमांक एम. एच. २५ ए. आर. ३०६२ या मोटरसायकलीस धडक दिल्याने तो रस्त्यावर पडला. त्याच्या डोक्याला मार लागल्याने त्यास उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल केले.

## खडकीत शॉक बसल्याने पिता-पुत्राचा मृत्यू

✔ **सुराज्य/सोलापूर** : धुतलेले कपडे छतावर टाकताना विद्युत वाहिनीचा शॉक बसल्याने वडील आणि मुलगा असे दोघेजण मरण पावले. ही दुर्घटना खडकी (ता. तुळजापूर) येथे आज रविवारी दुपारच्या सुमारास घडली.

सचिन शामराव भंडारे (वय ४०) आणि त्यांचा मुलगा जय सचिन भंडारे (वय १२ दोघे रा. खडकी ता. तुळजापूर) अशी मयत झालेल्या पिता-पुत्राची नावे आहेत. नवरात्र सणानिमित्त भंडारे कुटुंबीय घरात कपडे धुतले होते. धुतलेले कपडे छतावरील दोरीवर वाळविण्यास टाकताना जय भंडारे (मुलगा) याचा स्पर्श विद्युत वाहिनीचा लागला. त्याला वाचविण्याचा प्रयत्न सचिन भंडारे यांनी केला. तेव्हा दोघांना शॉक बसल्याने भाजून जखमी झाले होते. त्यांना बेशुध्द अवस्थेत सुनील सोनवणे (शेजारी) यांनी उपचारासाठी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले असता दोघेही उपचारापूर्वीच मयत झाले. या घटनेची प्राथमिक नोंद सदर बजार पोलिसात झाली.

## शॉक बसल्याने युपीमधील कामगाराचा मृत्यू

✔ **सुराज्य/सोलापूर** : होटगी रोडवरील विमा हॉस्पिटलमध्ये अग्निशमन युनिटचे काम करताना विजेच्या शॉक बसल्याने उत्तर प्रदेशचा कामगार मरण पावला. ही दुर्घटना रविवारी दुपारच्या सुमारास घडली.

विनोद छोटक मिश्रा (वय २९ रा. गांगरणी, कुशीनगर, उत्तर प्रदेश) असे मयत झालेल्या तरुणाचे नाव आहे. विमा हॉस्पिटलमध्ये ठेकेदारामार्फत अग्निशमन नियंत्रणचे काम चालू आहे. त्याचे काम करताना शॉक बसल्याने विनोद मिश्रा हा खाली कोसळला. त्याला प्राथमिक उपचार करून शासकीय रुग्णालयात दीपक कांबळे (ठेकेदार) यांनी दाखल केले असता तो उपचारापूर्वीच मयत झाला. या घटनेची नोंद सदर बजार पोलिसात झाली आहे.

# खुद्द मालकच वैतागले महास्वामींच्या कारभाराला

**शिवाचार्यांचे नाव काढताच देशमुखांची गांधीगिरी**

**महास्वामींना खासदार केल्याचा आता होतोय पश्चात्ताप**

✔ सुराज्य/शिवाजी भोसले

गौडगाव मठाचे मठाधिपती डॉ. जय सिध्देश्वर महास्वामी यांना सोलापूरचे खासदार करण्यात अत्यंत मोलाचे योगदान दिलेले सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदार संघाचे भाजपचे आमदार विजयकुमार देशमुख हेच आता महास्वामी यांच्या कारभाराला वैतागले असून महास्वामी यांचे नाव काढताच देशमुख हे हात जोडताहेत. महास्वामींना खासदार केल्याचा म्हणे आता मालकांना खूप पश्चात्ताप होत आहे, अशी चर्चा भाजप कार्यकर्त्यांमध्ये दबक्या आवाजात सुरू आहे. महास्वामींच्या प्रकरणात होत असलेल्या पश्चातापाबद्दल खुद्द देशमुख हे आपल्या अत्यंत निकटवर्तीयांकडे व्यथा बोलून दाखवत आहेत. शिवाय महास्वामींच्याबद्दल तक्रारी घेऊन गेलेल्या संबंधितांकडे देखील देशमुख आपल्या भावना व्यक्त करत असल्याचे कळते.

दोन देशमुखांच्या गटा-तटाच्या लढतीमध्ये आपल्या केवळ गटाचाच नव्हे तर आपल्या खास मर्जीमधील खासदार असावा यासाठी आमदार सुभाष देशमुख यांनी पुणेरी चेहरा अमर साबळे यांना सोलापूरचा खासदार बनविण्यासाठी घाट घातला. त्यासाठी आपली सगळी शक्ती सुभाष देशमुखांनी पणाला लावली होती. त्याचदरम्यान सुभाष देशमुख यांच्या याच फार्म्यूल्याचा विचार करत, आमदार विजयकुमार देशमुख यांनी डॉ. जयसिध्देश्वर महास्वामी यांना खासदार करण्याचा चंग बांधला. या दरम्यान महास्वामी यांची पुण्याई फळाला आली. विजयकुमार देशमुख यांनी महास्वामींसाठी टाकलेल्या सोंगट्या उजव्या पडल्या. गोडगावच्या मठामधील मठाधीश सोलापूरचे खासदार झाले. शिवाचार्य खासदार होण्यात विजयकुमार देशमुख मालकांचा सिंहाचा वाटा राहिला.

मात्र, महास्वामी यांच्या कारभाराबद्दल विजयकुमार देशमुख हेच नापसंती व्यक्त करत आहेत, असे समजते. महास्वामींचा विकास कामांविषयी मतदारांना भेटण्याच्याबाबतीत जो नकारात्मक कारभार आहे, तो देशमुखांना खटकत आहे, अशी खुद्द चर्चा देशमुखांच्या संपर्क कार्यालयात आहे. महास्वामी नागरिकांना भेटत नाहीत. मोबाईल रिसीव्ह करत नाहीत. त्यांचा मोबाईल रिसीव्ह झाल्यास ते पूजेत आहेत, कामात आहेत, विश्रांती घेत आहेत, अशी उत्तरे नागरिकांना मिळतात. त्यातून नागरिकांची कामे अडली आहेत. अडलेले नागरिक जेव्हा विजयकुमार देशमुख यांच्या संपर्क कार्यालयात जाऊन त्यांना महास्वामींबद्दल सांगतात, त्यावेळेस आमदार देशमुख हे महास्वामींबद्दल हात जोडून नाराजी व्यक्त करत असल्याचे नागरिक सांगतात.



## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



कधी पर्यंत हे असं ऐकत बसायचं?

### अडवली अरळी पुलाची शिफारस

दक्षिण सोलापूर आणि मंगळवेढा या दोन तालुक्यांना जोडणारा पूल अरळी इथे उभारण्याचे प्रस्तावित आहे. अंदाजे ४० कोटींचा खर्च या पुलाच्या उभारणीसाठी अपेक्षित आहे. दोन तालुक्यांचा विचार करता या पुलाची उभारणी होणे अत्यंत महत्त्वाचे आहे. या पुलाच्या मंजुरीसाठी दक्षिण तालुक्याचे आमदार सुभाष देशमुख, मंगळवेढ्याचे आमदार समाधान अवताडे, पंढरपूरचे माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्यासह अन्य जणांच्या शिफारशी मिळाल्या आहेत. तथापि, महास्वामी यांनीच खुद्द या पुलाची शिफारस अडविल्याचे दक्षिण सोलापूर तालुक्याचे राष्ट्रवादीचे अध्यक्ष बसवराज बगले यांनी सांगितले. या पुलाच्या शिफारशीसंदर्भात महास्वामींकडे अनेक वेळा पाठपुरावा केला. पाहतो, माहिती घेतो, अभ्यास करतो, अशी उत्तरे महास्वामी यांच्याकडून मिळत असल्याचेही बगले यांनी सांगितले.

### मतदार वैतागले

महास्वामींचे संपर्क कार्यालय हे शेळगीला एका कोपऱ्यात, कोनाड्याला मठात आहे, संपर्कासाठी तिथे जाणे गैरसोयीचे आहे, शारीरिक मानसिक व आर्थिकदृष्ट्या ते त्रासाचे आहे. संपर्क कार्यालयात महास्वामी भेटत नाहीत, तिथे भेटण्याची त्यांची निश्चित वेळ नाही. संपर्क कार्यालयातील कर्मचारी हे महास्वामींच्या भेटण्याबद्दल नीट सांगत नाहीत. अनेक सबबी सांगून नागरिकांना परत पाठवून देतात, असा प्रत्यक्ष भेटायला जाणाऱ्यांचा अनुभव आहे. गौडगावला मठात भेटायला गेले तरी तिथेही महास्वामी भेटत नाहीत. सोलापूरला गेलेत, दिल्लीला गेलेत, त्यांच्याकडे महाराज लोक आलेत भेटणार नाहीत, पूजा सुरु आहे, वेळ लागेल, विश्रांती घेत आहेत. उशीर लागेल. पुन्हा या असे म्हणून मठातून मतदारांना पिटाळून लावले जात आहे. या सगळ्या पार्श्वभूमीवर, खासदार महास्वामी म्हणजे 'असून अडचण अन् नसून खोळंबा' या पेक्षा वेगळी परिस्थिती नाही अशा प्रतिक्रिया अनेकांनी 'सुराज्य'कडे व्यक्त केल्या.

# स्वागत आणि चिंताही

न्यायव्यवस्थेत पारदर्शकता आणण्यासाठी न्यायपालिकेकडून विविध प्रकारांचे महत्त्वाचे पाऊल उचलले जात आहे. २७ सप्टेंबरपासून सर्वोच्च न्यायालयातील महत्त्वाच्या घटनापीठांपुढे होणाऱ्या सुनावणीचे थेट प्रक्षेपण केले जाणार आहे. २० सप्टेंबर रोजी या न्यायालयाने याबाबतचा निर्णय घेतला. त्यामुळे येथून पुढे महत्त्वाच्या खटल्यांची सुनावणी देशभरातील नागरिकांनाही पाहायला मिळेल. सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीचे थेट प्रक्षेपण करण्यात यावे, याबाबत याचिका दाखल केल्यानंतर सुमारे चार वर्षांनी हा निर्णय घेण्यात आला. या निर्णयाचे अनेकांनी स्वागत केले पण काही जणांनी त्याविषयी चिंताही व्यक्त केली. २६ ऑगस्ट रोजी माजी सरन्यायाधीश एन. व्ही. रमणा यांच्या निवृत्तीच्या दिवशी सर्वोच्च न्यायालयाने आपल्या सुनावणीचे थेट प्रक्षेपण केले होतं. मात्र, न्यायव्यवस्थेत पारदर्शकता आणण्याबाबतचे पहिले पाऊल २०१८ साली टाकण्यात आले होते. तत्कालीन सरन्यायाधीश दीपक मिश्रा, न्यायमूर्ती ए. एम. खानविलकर आणि न्यायमूर्ती डी. वाय. चंद्रचूड यांचा समावेश असलेल्या तीन न्यायाधीशांच्या खंडपीठाने घटनात्मक आणि राष्ट्रीय हिताच्या खटल्यांवरील न्यायालयीन कामकाजाचे थेट प्रसारण करण्याची मागणी करणाऱ्या जनहित याचिकेवर सुनावणी करण्यास सहमती दर्शवली होती. सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या कामकाजाची माहिती सर्वसामान्य नागरिकांना मिळावी याबाबत २०१८ साली सर्वोच्च न्यायालयात एक याचिका दाखल करण्यात आली होती. त्यात ज्येष्ठ वकील इंदिरा जयसिंग यांचाही समावेश होता. यानंतर मार्च २०१८ मध्ये न्यायालयाने भारताचे ॲटर्नी जनरल के .के. वेणुगोपाल यांना



पत्र लिहून संबंधित याचिकेवर त्यांचे मत मागवले होते. यावर चाचणी प्रकल्प म्हणून सरन्यायाधीशांचे न्यायालय (कोर्ट क्रमांक १) आणि घटनापीठांसमोरील सुनावणीचे थेट प्रक्षेपण करण्याची शिफारस वेणुगोपाल यांनी केली. या प्रकल्पाच्या यशावरून सर्वोच्च न्यायालयासह संपूर्ण भारतातील न्यायालयांमधील सुनावणीचे थेट प्रक्षेपण करावे की नाही? हे ठरेल असेही, ॲटर्नी जनरल म्हणाले. सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीसाठी याचिकाकर्त्यांना लांबचा पल्ला गाठून यावे लागते, हा त्रास कमी करण्यासाठी आणि न्यायालयातील लोकांची गर्दी कमी करण्यासाठी थेट प्रक्षेपण करायला हवे, अशी शिफारसही ॲटर्नी जनरल वेणुगोपाल यांनी केली होती.यानंतर वेणुगोपाल यांनी सुचवलेल्या जवळपास सर्व शिफारशी आणि मार्गदर्शक तत्त्वे सर्वोच्च न्यायालयाने मंजूर केले. यामध्ये संबंधित सुनावणीचे शब्दांकन करण्यासोबत सुनावणीचे कामकाज व्हिडिओ स्वरूपात जतन करावे, अशी शिफारशी सुचवल्या आहेत. शिवाय काही खटल्यांमध्ये थेट प्रसारण रोखण्याचा अधिकार न्यायालयाकडे राखून ठेवला पाहिजे. काही खटल्यांचे थेट प्रक्षेपण करण्यास परवानगी देऊ नये, असेही वेणुगोपाल यांनी सूचित केले आहे. वैवाहिक विवादासंबंधित खटला, अल्पवयीन आरोपींच्या खासगी जीवनाचे संरक्षण आणि त्यांची सुरक्षितता यांचा समावेश असलेली प्रकरणे, राष्ट्रीय सुरक्षेचे मुद्दे, पीडित, साक्षीदार किंवा प्रतिवादी कोणत्याही दडपणाशिवाय जबाब नोंदवू शकतील, याची खात्री करण्यासाठी थेट प्रक्षेपण टाळले जाऊ शकते. असुरक्षित किंवा घाबरलेल्या साक्षीदारांना विशेष संरक्षण द्यायला हवे. साक्षीदाराने किंवा पीडित पक्षाने निनावी प्रसारण करण्यास संमती दिल्यास त्यांचा चेहरा ब्लर करण्याची तरतूद केली जाऊ शकते. लैंगिक अत्याचार आणि बलात्काराशी संबंधित सर्व प्रकरणांमध्ये गोपनीयता राखण्यासाठी किंवा संवेदनशील माहितीचे संरक्षण करण्यासाठी थेट प्रक्षेपण केले जाऊ नये. न्यायव्यवस्थेची कुप्रसिद्धी होईल अशी प्रकरणे, एखाद्या समुदायाची भावना भडकवणारी किंवा समुदायांमध्ये वैर निर्माण करणारी प्रकरणे असे विषय टाळायला हवेत, असा सूर विधी क्षेत्रात आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर, गुजरात उच्च न्यायालयाने जुलै २०२१ पासून न्यायालयातील सुनावणीचे थेट प्रसारण करायला सुरुवात केली आहे. सध्या झारखंड, कर्नाटक, मध्य प्रदेश, ओरिसा आणि पाटणा उच्च न्यायालयांनीही न्यायालयातील कामकाजाचे थेट प्रसारण करण्यास सुरुवात केली आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयही हा निर्णय घेण्याचा विचार करत असल्याचे समजते. न्यायालयीन कामकाजाचे थेट प्रसारण करणं, हे पारदर्शकतेच्या दिशेने टाकलेलं एक पाऊल आहे. मात्र, यामुळे न्यायाधीश आणि सुनावणी पाहणाऱ्या लोकांवर पडणाऱ्या प्रभावाबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. कारण भारतीय न्यायालयांमधील सुनावणीबाबतचे काही व्हिडिओ क्लिप आधीपासून यूट्यूब आणि इतर सोशल मीडियावर प्लॅटफॉर्मवर उपलब्ध आहेत. अशा व्हिडिओंना सनसनाटी शीर्षके देण्यात आली आहे. शिवाय न्यायालयातील सुनावणीच्या व्हिडिओचा वापर बेजबाबदारपणे केला जाऊ शकतो. यामुळे लोकांमध्ये चुकीची माहिती पसरवली जाऊ शकते, अशी चिंता व्यक्त केली जात आहे.

## सामाजिक

# ...अखेर 'लक्ष्मी' शांत झाली

**सुमारे ९३ वर्षे सोलापूरकरांच्या सेवेत असणारी लक्ष्मी अखेर शांत झाली. चंचल लक्ष्मीला शांत करण्याचे धाडस ज्या सोलापूरकरांच्या अंगी दिसून आले, त्यांचे कौतुकच करायला हवे ना? आपल्या चंचलतेचा गर्व असणारी लक्ष्मी शांत करून या तथाकथित धाडसी सोलापूरकरांनी लक्ष्मीला आपले गुण दाखवून दिलेले आहेत.**

स्वातंत्र्याचा संग्राम असो, दुसरे महायुद्ध असो, स्वातंत्र्यानंतरचा भारत असो, १९७२ चा दुष्काळ असो. देशाच्या अर्थकारणात झालेले आमूलाग्र बदल असोत नाहीतर नोटबंदी, या व अशा अनेक संकटांना तोंड देत लक्ष्मी कार्यरत होती. सर्वसामान्य मध्यमवर्गीय कुटुंबाप्रमाणे ती आपला संसार थाटून होती आणि सांभाळून होती. शहरातील तत्कालीन नामवंत प्रामाणिक व्यक्तींनी लक्ष्मीची प्रतिष्ठापना केलेली होती. अर्थातच ही सारी मंडळी प्रामुख्याने ब्राह्मण समाजाची होती हे सांगावेच लागेल. कारण अनेक उत्तमोत्तम संस्था ब्राह्मणांनी स्थापन केल्या आहेत. नंतर अनेक कारणाने ज्यामध्ये राजकीय आणि त्याला विसरून येणारी जातीची समीकरणे सुद्धा आहेत, या व अशा संस्थावरील ब्राह्मणांचे नियंत्रण संपलेले होते. अर्थात हा एक स्वतंत्र विषय आहे. त्यावर कधीतरी भाष्य करू. असो.

सर्वसामान्यांना आपली वाटणारी लक्ष्मी सहकारी बँक उत्तरार्धातील संचालकांच्या कारभारामुळे आज अस्तंगत पावलेली दिसते आहे. कायद्याच्या चौकटीचा विचार केला तर तिला पुनर्जिवीत करता येईल असे म्हणतात. पण यासाठी पुढाकार घेणार कोण? हा एक मोठा प्रश्न उपस्थित झालेला आहे. कारण मागील संपूर्ण वर्षभरात लक्ष्मी सहकारी बँक नव्या उभारीने सुरू व्हावी यासाठी कोणी काही फार मोठे प्रयत्न केल्याचे दिसून येत नाहीत. एक थकीत कर्जदार यासाठी पुढाकार घेत होता. पण तो प्रामाणिक नसल्यामुळे आणि स्वत:चे पैसे परत करण्याची वृत्ती नसल्यामुळे, त्याचे नेतृत्व कोणी स्वीकारले नाही आणि ते स्वीकारण्यासाठीही नव्हते. म्हणून लक्ष्मी बँकेच्या पुनर्जीवनाबाबत नवा मोठा प्रश्न निर्माण झालेला आहे. काळाच्या उदरात काय घडले आहे त्याचा प्राथमिक अंदाज येत आहे पण ही बँक नव्याने उभारी घ्यावी, अशीच सर्वसामान्य जनतेची इच्छा आहे.

या लक्ष्मीने अनेकांना अंगावर खांद्यावर घेऊन खेळवलेले आहे. लहानाचे मोठे केलेले आहे. वेळोवेळी आपल्या सहवासाने जमेल त्याचे, जमेल तेवढे आयुष्य समृद्ध करण्याचा प्रयत्न केलेला आहे. चार-पाच पिढ्यांची सेवा या लक्ष्मीने केली आहे, असे म्हटले तर ते अतिशयोक्तीचे होणार नाही.

कर्जदारांनी कर्ज नियमाप्रमाणे आणि वेळेत परत केले नाही. म्हणून लक्ष्मीला शांत व्हावे लागलेले आहे. खरंतर हे कर्जदार लक्ष्मी सहकारी बँकेचे सभासद. दुसऱ्या अर्थाने आपण त्याला मालकच म्हणतो ना? याच मालकांनी आपलं घर विकून खाण्याचे धंदे केले आहेत, असेच आता म्हणावयाची वेळ आलेली आहे. 'कुऱ्हाडीचा दांडा होतास काळ' असे जे म्हणतात, ते सर्व सहकारी बँकांच्या बाबतीमध्ये खरे होताना दिसत आहे. ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

या लक्ष्मीने अनेकांचे आयुष्यात मोठा आर्थिक हातभार लावलेला आहे. पण आपलेच खिसे भरण्याच्या व्यक्तींच्या लोकात या बँकेचे नियंत्रण गेल्यामुळे आज लक्ष्मीला शांत व्हावे लागलेले आहे. एक गोष्ट विशेषत्वाने नमूद करावीशी वाटते. या संदर्भात जेव्हा जेव्हा आम्ही भाष्य करतो तेव्हा तेव्हा अनेकांना आपल्या भावना दुखावल्या गेल्याची आठवण होते. पण या सर्वांनी पुन्हा एकदा शांत चित्ताने पुढे जे काही विचार आम्ही मांडत आहोत त्यावर गांभीर्याने विचार करण्याची वेळ आलेली आहे. सोलापूर शहरातील पूर्व भाग खरंतर उद्यमशील लोकांचा भाग. लक्ष्मीच्या वास्तव्याने आणि चलनवलनाने समृद्ध झालेला भाग. या लक्ष्मीने त्यांना एवढे भरभरून दिले की, पूर्व भागातून आता सोन्याचा धूर निघायचाच काय तो शिल्लक राहिलेला आहे, असे म्हणावयाची वेळ आलेली होती. मात्र, याच पूर्व भागातील नेत्यांच्या नेतृत्वाखालील सहकारी बँकांनी आपला जीव गमावलेला आहे असे दिसते आहे. याला काय म्हणायचे?

साधारणतः ३० वर्षांपूर्वी लक्ष्मी सहकारी बँकेचे लेखापरीक्षण करण्याचा योग आमच्या आयुष्यात आलेला होता. बँकेस नावे ठेवावीत असे काही नव्हते. बँकेच्या अमृत महोत्सवी वर्षात तज्ज्ञ



संचालक या भूमिकेतून या बँकेची एक वर्ष सेवा करण्याची संधी आम्हांला मिळालेली होती. सोबत जोडलेला छायाचित्र, हे त्यावर्षी बँकेने भेट दिलेल्या लक्ष्मीच्या चांदीच्या मूर्तीचे छायाचित्र आहे. आज याच मूर्तीकडे बघत असताना मन सुन्न झालेले आहे आणि डोळे पाणावलेले.

अजून एक गोष्ट नमूद करावयाची आहे. आम्हीही आज बँकेच्या थकीत कर्जदाराच्या यादीतील एक सभासद आहोत. ज्या तारणाच्या आधारावर कर्ज घेतलेले होते ते तारण विकून बँकेने आमच्याकडील कर्जाची वसुली करावी, ते विकले जाईल याची पूर्णपणे आम्ही खात्री देतो, असे बँकेस गेली अनेक वर्षे आम्ही बँकेस सांगत आलेलो होतो व आहोत. अगदी आज जे प्रशासक नेमलेले आहेत त्यांनाही आम्ही भेटून हे सांगितलेले आहे. मात्र यास मोडता घातला जात आहे, तो बँकेच्या वकिलाकडूनच असे काहीसे सध्याचे चित्र आहे. आम्ही स्पष्टपणे, स्वच्छपणे आणि प्रामाणिकपणे सांगत आहोत, बँकेची संपूर्ण थकबाकी देण्यास आम्ही बांधील आहोत. ती दिल्याशिवाय आम्हांसही शांत झोप लागणारी नाही. मात्र बँकेच्या गेल्या काही वर्षांच्या व्यवस्थापनाने आणि आत्ताच्या प्रशासकीय यंत्रणेतील व्यवस्थापनाने जी काही धोरणे स्वीकारलेली आहेत, तीच बँकेच्या थकीत कर्जाच्या वसुलीच्या आड येत आहेत हे नक्की.

आम्हांस बँकेच्या कर्जदारांची यादी पाहण्यास मिळालेली आहे. यातील बरेच जण अनेक दशके आणि एक दोन पिढ्या बँकेचे कर्जदार आहेत असे सकृतदर्शनी दिसते आहे. ही नावे प्रशासक जाहीर का करत नाहीत? हा मोठा प्रश्न आहे. धन दांडगे ज्यांना म्हणतात अशी काही नावे यात असावीत असा संशय घेण्यास जागा आहे.

लक्ष्मी सहकारी बँकेच्या आजच्या स्थितीवरती नेमके काय भाष्य करावे? या विचाराने मनात थैमान घातलेले आहे. अर्थातच या विचारांना पोरकटपणाने भरकटू देणे आमच्या वृत्तीला, स्वभावाला आणि आजपर्यंतच्या कार्याला साजेसे नाही. म्हणूनच यावर यापुढे जे काही भाष्य करावयाचे आहे ते सर्व परिस्थितीचा, वस्तुस्थितीचा आणि कायद्याचा अभ्यास करून करावे, असे आमचे मन आम्हांस सांगत आहे. मनाचे ऐकले पाहिजे.

**- श्रीनिवास वैद्य, सोलापूर.**

## टुडेज ब्लॉग

# सद्यकाळात संस्कारांचे महत्त्व

**म्हटलं तर सर्व काही आलबेल आहे पण तरीही कुठंतरी काहीतरी खटकतंय असं सध्याच्या समाजातील कौटुंबिक परिस्थितीविषयी म्हणता येईल. काही काळापूर्वी समाजात, घरात वागण्याच्या चालीरीती ह्याविषयी काहीसे लवचिकता नसणारे नियम रूढ होते. ह्या नियमांची अंमलबजावणी करण्यात पुढाकार घेणारी वरिष्ठ माणसं घरात, गावांत असत. हे नियम न पाळणाऱ्या बाळगोपाळांचे आणि प्रसंगी मोठ्यांचे कान पकडण्याचा, त्यांना दोन शब्द सुनाविण्याचा अधिकार ह्या वरिष्ठ माणसांना होता.**

पूर्वापार ही पद्धती, हे मॉडेल व्यवस्थित चाललं. आता ह्यातील व्यवस्थित ह्या शब्दप्रयोगावर आक्षेप घेतला जाऊ शकतो. ह्या पद्धतीमुळं आपण येणाऱ्या नवीन पिढीला दाबून ठेवलं, त्यांना फुलण्याची संधी दिली नाही वगैरे आक्षेप घेतले जाऊ शकतात. इंग्लिशमध्ये Pandora's Box हा शब्दप्रयोग वापरला जातो. एखादा पर्याय सर्वांना उपलब्ध करून दिल्यास निर्माण होणाऱ्या संभाव्य परिणामांची जर आपल्याला कल्पना करता येत नसेल तर तो पर्याय उपलब्ध करून देऊच नये असा साधारणतः मतितार्थ असतो. कदाचित ह्याच विचारामुळं आपल्या पूर्वजांनी काहीसं कठोर अथवा कर्मठ म्हणता येईल असं धोरण स्वीकारलं होतं. ह्या धोरणाविरुद्ध पिढ्यान्‌पिढ्या काहीशा दबल्या आवाजात होणाऱ्या कुजबुजीचं गेल्या दोन तीन पिढ्यांत जवळपास बंडखोरीत झालं. हे काहीसे अतिरंजित वर्णन झालं. अजूनही परंपरांचं व्यवस्थित पालन करणारी अनेक कुटुंब भोवताली आहेत, फक्त त्यांचं प्रमाण कमी झालं आहे. आता पोस्टचा ओघ परत मुक्त विचारसरणीकडं वळवूयात. आपल्या कुटुंबातील परंपरांना, चालीरीतींना पूर्णपणे बगल




देऊन आपल्या इच्छेनुसार वागणारा असा हा वर्ग. त्यांच्या ह्या वागण्याला तात्पुरतं बंडखोरी म्हणूयात. ह्या बंडखोरीमागं विविध कारणं असू शकतात.

१) जसा काळ बदलत गेला तसं परंपरांचे हस्तांतरण करताना त्यामागील मूळ हेतू नवीन पिढीला व्यवस्थित समजावून देणं आवश्यक होतं. ह्यासाठी नवीन पिढीला आपल्या बरोबरीची वागणूक देऊन त्यांच्याशी सुसंवाद साधणं आवश्यक होतं. बऱ्याच कुटुंबात हे घडलं नाही.

२) नवीन पिढीचा वेगानं पाश्चिमात्य / आधुनिक जीवनपद्धतीशी संपर्क आला, त्या झंझावाताने नवीन पिढी काहीशी बहकली. तरुण पिढीला आकर्षित करण्यासाठी जे काही आवश्यक आहे ते सर्व काही ह्या जीवनपद्धतीने आपल्या पुढ्यात ठेवलं. आपल्या संस्कृतीचा ह्या झंझावातापासून बचाव करण्यासाठी ज्या सुसंवादाची गरज होती त्यात आपण कमी पडलो.

ह्या झंझावाताला येऊन किंवा आपल्या चालीरीतींच्या परीक्षेचा काळ सुरू आता काही वर्षे उलटली आहेत. जसं आता युक्रेन पलटवार करू पाहतोय किंवा वेगवान गोलंदाजांनी आघाडीच्या तिघा चौघांना परत पाठविल्यानंतर वर्षानुवर्षे मधली फळी आणि यष्टिरक्षक आपला डाव सावरतात तसं आपल्याला आपल्या चालीरीती सावरण्याचा प्रयत्न करता येईल, हा महत्त्वाचा मुद्दा इथं मी मांडू पाहत आहे.

आपल्या संस्कृतीशी फारकत घेऊन स्वतंत्र वागण्याचा आनंद घेणाऱ्या पिढीला कदाचित ह्यातील त्रुटी जाणवू लागल्या असतील. प्रत्यक्ष जीवनातील त्यांना सामोऱ्या जाव्या लागणाऱ्या प्रसंगामुळं आपल्या आधीच्या पिढीतील लोकांनी आपल्याला विशिष्ट पद्धतीनं वागण्याचा आग्रह का केला हे त्यांना उमजलं असेल. हीच वेळ आहे जेव्हा आपण पुन्हा परंपरा, चालीरीती ह्यांना काळानुसार योग्य रूपात सर्वांच्या समोर आणलं पाहिजे.

हल्लीच्या काळात एकटेपणाच्या भावनेनं बऱ्याच जणांना ग्रासलं आहे. जुन्या काळातील जमेल तितक्या गोष्टींचा काळानुसार बदललेल्या स्वरूपात स्वीकार केल्यास मानसिक स्थैर्यास नक्कीच मदत होऊ शकेल. नवीन जीवनपद्धतीचा तर आपणांस स्वीकार करायचाच आहे पण त्या प्रवासात जुन्या चालीरीती, जुने संस्कार ह्यांची योग्य रूपात मदत घेतल्यास भविष्य सुखकारक होईल. हा लढा प्रत्येक घराघरातून लढला गेला पाहिजे.

**- आदित्य पाटील.**

## बोधकथा

# गरुड आणि घुबड



एक गरुड आणि एक घुबड, फार दिवस एकमेकांशी भांडत असत. शेवटी त्यांनी परस्परांशी मित्रत्वाने वागण्याची शपथ घेतली व एकमेकांच्या पिल्लांस खाऊ नये असे ठरविले.

घुबड गरुडास म्हणाले, 'गड्या! पण माझी पिल्ले कशी असतात, हे तुला ठाऊक आहे ना? ठाऊक नसेल तर ती दुसऱ्या एखाद्या पक्ष्याची आहेत असे समजून तू त्यांना गट्ट करशील अशी मला भीती वाटते,' गरुड म्हणाला, 'खरेच, तुझी पिल्ले कशी असतात, हे मला मुळीच ठाऊक नाही.'

घुबड म्हणाले, 'ऐक तर. माझी पिल्ले फार सुंदर असतात. त्यांचे डोळे सुंदर, पिसे सुंदर, सगळेच काही सुंदर असते. या वर्णनावरून माझी पिल्ले कोणती हे तुला सहज समजेल.' पुढे एके दिवशी, एका झाडाच्या ढोलीत, गरुडास घुबडाची पिल्ले सापडली. ती घाणेरडी, कंटाळवाणी आणि कुरूप पिल्ले मारून खाण्यास काही हरकत नाही' असे म्हणून त्याने त्या पिलांचा फडशा उडविला! आपली पिल्ले नाहीशी झालेली पाहून घुबड गरुडाला म्हणाले, 'गड्या ! माझी पिल्ले तूच मारून खाल्लीस, असे मला वाटते.' गरुड म्हणाला, मी खाल्ली खरी, पण तो माझा दोष नव्हे. तू आपल्या पिल्लाचे जे खोटेचे वर्णन केलेस, त्यामुळे ती मला ओळखिता आली नाहीत. इतकी कुरूप पिल्ले घुबडाची नसतील, दुसऱ्या एखाद्या पक्ष्याची असतील, असे समजून मी ती मारून खाल्ली, यात माझा काय अपराध आहे बरे?' **तात्पर्य : स्वत:संबंधाची खरी हकिकत लपवून ठेवून, भलतीच हकिकत सांगणारा मनुष्य शेवटी स्वत:ला संकटात पाडून घेतो.**

## जन्म हा अखेरचा

# परकायस्थल - २

आपले नाम जपले नाही, आपले ध्यान केले नाही. त्यामुळेच मला हा जन्म घ्यावा लागला. हा एक अपराध माझ्याकडून घडला आहे. आता या जन्मात मी आपल्याला नमस्कार करीत आहे. आपले भजन करीत आहे. नामस्मरण करीत आहे, म्हणून मला विश्वास आहे की यानंतर मला पुनर्जन्म मिळणार नाही तर मुक्ती मिळणार आहे. त्यामुळे पुढील जन्मात मी आपल्याला नमस्कार करु शकणार नाही. हा दुसरा अपराध माझ्याकडून घडला आहे. म्हणून या दोन अपराधांबद्दल परमेश्वरा, मला क्षमा करा.

याचे तात्पर्य असे की, ईश्वरभक्ती न केल्यामुळे जीवात्म्याला वारंवार जन्म घ्यावा लागतो. जन्माचे मूळ कारण वासना होय. वासनेचे मूळ कर्म आहे. आपण जी कर्मे करतो त्यामुळे आपली वासना निर्माण होते. येथे आणखी एक सूक्ष्म विचार केला पाहिजे. बऱ्याच वेळा दैववादी आणि प्रयत्नवादी लोकांमध्ये भांडण चाललेले असते. प्रारब्ध श्रेष्ठ की कर्म श्रेष्ठ? जर प्रारब्ध बलिष्ठ असेल आणि त्याप्रमाणेच आयुष्य घडणार असेल तर प्रयत्न, कर्म कशाला करायचे? येथे सूक्ष्म चिंतन केलेले आहे.

मनुष्य जेंव्हा कर्म करतो तेंव्हा त्याच्या कर्मफलाचे दोन भाग होतात. त्याने विहित कर्म केले तर त्याचे एक फल असते पुण्य आणि त्याच्या दुसरा भाग असतो शुभवासना. **(क्रमश:) – काशी जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी.**

## जनमानस

# सणवार कशासाठी?

अन्नधान्याची होणारी नासाडी, अतिखादाडपणा यासंदर्भात चिंता व्यक्त होते. गरजेपेक्षा अधिक खाणे, खाद्यपदार्थ सेवन करण्यासाठी हॉटेल्स, हातगाड्या, ढाब्यावर गर्दी असते. पूर्वी घरचे जेवण सर्वोत्तम समजले जाई व तेच खरे आहे. आता सर्वांना या गोष्टी शक्य होत नसतील पण तरीही घरी बनवलेले पदार्थ हितकर आहेत. सणवार जवळ आले की, अनेक महागड्या पदार्थांत भेसळ होते. पनीर, खवा, मिठाईमध्ये होणारी भेसळ ओळखणे व हे पदार्थ खाऊन होणारे दुष्परिणाम त्याहूनही कठीण आहेत. शक्यतो खात्रीच्या दुकानातून खरेदी किंवा घरी पदार्थ बनवून सेवन करणे योग्य असेल. सणवार कशासाठी? आनंदासाठी की भेसळयुक्त मिठाई खाऊन आजारी पडण्यासाठी? **- अर्चना काळे, नाशिक.**

# नवरात्र व्रताचा इतिहास, महत्त्व आणि शास्त्र

**सर्वमंगल मांगल्ये शिवे सर्वार्थ साधिके ।
शरण्ये त्र्यंबके गौरी नारायणि नमोस्तुते ।।**

**अर्थ :** सर्व मंगलकारकांची मंगलरूप असणारी; स्वतः कल्याणशिवरूप असणारी; धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चारही पुरुषार्थ साध्य करून देणारी; शरण जाण्यास योग्य असणारी; त्रिनेत्रयुक्त असणारी अशा हे नारायणी देवी, तुला मी नमस्कार करतो.

श्री दुर्गादेवीच्या अतुलनीय गुणवैशिष्ट्यांची ओळख या एका श्लोकावरून होते. जीवनाला परिपूर्ण करणारे जे-जे आहे, त्या त्या सर्वांचे मूर्तिमंत प्रतीक म्हणजे आदिशक्ती श्री दुर्गादेवी. श्री दुर्गादेवीला सर्व जगताची जननी म्हटले आहे. जगताची जननी आपणा सर्वांचीच ती आई असल्याने लेकरांच्या हाकेला सत्वर धावून येते. महिषासुराच्या नाशासाठी अवतार घेणाऱ्या श्री दुर्गादेवीचा उत्सव म्हणजे नवरात्र ! नवरात्रात घटस्थापना करतात. घटरूपी ब्रह्मांडात अवतीर्ण झालेल्या तेजस्वी अशा आदिशक्तींचे म्हणजेच श्री दुर्गादेवीचे अखंड तेवणाऱ्या नंदादीपाच्या माध्यमातून नऊ दिवस पूजन करणे म्हणजे नवरात्रौत्सव साजरा करणे. यावर्षी २६ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर या कालावधीत नवरात्रौत्सव साजरा होत आहे. नवरात्र हे देवीचे व्रत असून महाराष्ट्रासह अनेक ठिकाणी हे व्रत कुलाचार म्हणूनसुद्धा पाळले जाते. या व्रतात नऊ दिवस व्रतस्थ राहून देवीची मनोभावे आराधना केली जाते. आज अनेक राज्यांत याला उत्सवाचे स्वरूपही आले आहे. या उत्सवात हिंदूंना देवीतत्त्वाचा लाभ होतो; मात्र हल्ली नवरात्रौत्सवाला आलेल्या विकृत स्वरूपामुळे त्यातून देवीतत्त्वाचा लाभ तर दूरच; पण त्याचे पावित्र्यही घटले आहे. या उत्सवातील अनुचित प्रकार रोखून त्याचे पावित्र्य राखणे, हेही काळानुसार धर्मपालनच! नवरात्र व्रतामागील इतिहास, या व्रताचे महत्त्व आणि ते साजरे करण्यामागील शास्त्र या लेखातून जाणून घेऊया.

**इतिहास :** रामाच्या हातून रावणाचा वध व्हावा, या उद्देशाने नारदाने रामाला नवरात्रीचे व्रत करायला सांगितले. नंतर हे व्रत पूर्ण केल्यावर रामाने लंकेवर स्वारी करून शेवटी रावणाला ठार मारले. महिषासुर नावाच्या असुराशी प्रतिपदा ते नवमी असे नऊ दिवस युद्ध करून देवीने नवमीला रात्री महिषासुराला ठार मारले. तेंव्हापासून तिला 'महिषासुरमर्दिनी' म्हणू लागले. जगात जेंव्हा जेंव्हा तामसी, आसुरी आणि क्रूर लोक प्रबळ होऊन सात्त्विक अन् धर्मनिष्ठ सज्जनांना छळतात, तेंव्हा देवी धर्मसंस्थापनेकरता पुनः पुन्हा अवतार घेते. त्या देवतेचे हे व्रत आहे. नवरात्रीत देवीतत्त्व नेहमीपेक्षा १००० पटीने कार्यरत असते. देवीतत्त्वाचा अधिकाधिक लाभ मिळण्यासाठी नवरात्रीच्या काळात 'श्री दुर्गादेव्यै नमः ।' हा नामजप अधिकाधिक करावा.

**व्रत करण्याची पद्धत :** नवरात्र व्रताला पुष्कळ घराण्यांत कुलाचाराचे स्वरूप असते. आश्विन शुद्ध प्रतिपदेस या व्रताचा प्रारंभ होतो. घरात पवित्रस्थानी एक वेदी सिद्ध करून त्यावर सिंहारूढ अष्टभुजादेवीची आणि नवार्णयंत्राची स्थापना करावी. यंत्राशेजारी घट स्थापून त्याची आणि देवीची यथाविधि पूजा करावी. नवरात्र महोत्सवात कुलाचाराप्रमाणे घटस्थापना आणि मालाबंधन करावे. शेतातील मृत्तिका आणून तिचा दोन पेरे (बोटाची) जाड चौकोनी थर करावा आणि त्यात (पाच किंवा) सप्तधान्ये घालावी. जव, गहू, तीळ, मूग, राळे, सावे आणि चणे ही सप्तधान्ये होत.



मृत्तिकेचा किंवा तांब्याचा कलश घेऊन त्यात पाणी, गंध, फुले, दूर्वा, अक्षता, सुपारी, पंचपल्लव, पंचरत्ने किंवा नाणे इत्यादी वस्तू घालाव्यात. सप्तधान्ये आणि कलश (वरुण) स्थापनेचे वैदिक मंत्र येत नसल्यास पुराणोक्त मंत्र म्हणावेत. तेही येत नसल्यास त्या त्या वस्तूचे नाम घेऊन 'समर्पयामि' म्हणून नाममंत्रांचा विनियोग करावा. कलशामध्ये माळ पोहोचेल अशी बांधावी. नऊ दिवस प्रतिदिन कुमारिकेची पूजा करून तिला भोजन घालावे. सुवासिनी म्हणजे प्रकट शक्ती, तर कुमारिका म्हणजे अप्रकट शक्ती. प्रकट शक्तीचा थोडा अपव्यय होत असल्याने सुवासिनींपेक्षा कुमारिकेत एकूण शक्ती जास्त असते. अखंड दीपप्रज्वलन, त्या देवतेचे माहात्म्यपठन (चंडीपाठ), सप्तशतीपाठ, देवीभागवत, ब्रह्मांडपुराणातील ललितोपाख्यानाचे श्रवण, ललिता-पूजन, सरस्वतीपूजन, उपवास, जागरण इत्यादी कार्यक्रम करून क्षमता आणि सामर्थ्य यानुसार नवरात्र महोत्सव साजरा करावा. पूजकाला उपवास असला, तरी देवतेला नेहमीप्रमाणे अन्नाचा नैवेद्य दाखवावा. या काळात उत्कृष्ट आचाराचे एक अंग म्हणून श्मश्रू न करणे (दाढीमिशीचे केस आणि डोक्यावरील केस न कापणे), कडक ब्रह्मचर्यपालन, पलंगावर अन् गादीवर न झोपणे, सीमा न उल्लंघणे, पादत्राणे न वापरणे अशा विविध गोष्टींचे पालन केले जाते.

**संदर्भ : सनातन संस्थेचा ग्रंथ सण, धार्मिक उत्सव आणि व्रते'
संकलन- श्री. हिरालाल तिवारी
संपर्क- ९९७५५९२८५९**

सुराज्य सोलापूर हे दैनिक मुद्रक, प्रकाशक राकेश हरिपंत टोळ्ये यांनी सह्याद्री पब्लिशर्स, १५७/१५८, औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तेथे आणि ६०६/७/८, नारायण पेठ, पुणे-३० येथून एकाचवेळी प्रकाशित केले. सोलापूर मुख्य कार्यालय - फोन-०२१७-२६०७२०१, फॅक्स-०२१७-२६०७२०२, पुणे शहर कार्यालय - फोन/फॅक्स - ०२०-२४४६४७५५. I R. N. I. NO. MAHMAR / २००२/९७०७/२००३ I Email - dailysuraajya@gmail. com संस्थापक - स्व. राजेश विष्णूपंत कोठे, संपादक - राकेश टोळ्ये.



## युवा मोर्चाच्यावतीने पशुधनास लसीकरण

सुराज्य/सोलापूर : प्रभाग क्र ९ बाळे येथे लंम्पि या आजारावर प्रादुर्भाव रोखण्यासाठी बाळे भागातील शेतकऱ्यांच्या पशुधन सशक्त करण्यासाठी लसीकरण मोहीम घेण्यात आली शंभर पशुधनास लसीकरण करण्यात आले. यावेळी आ. विजयकुमार देशमुख, शहर अध्यक्ष विक्रम देशमुख, युवा मोर्चा शहर अध्यक्ष गणेश साखरे, राजाभाऊ आलूरे, समाधान आवळे, विनय मालक ढेपे, आनंद भवर, शिरीष सुरवसे, शंकर बंडगर, प्रेम भोगडे, व्यकेटेश बंग, विकास माने, तुषार अर्जुन, संकेत साळुंके, उत्कर्ष भंडगे, निलेश रंगारी, अमोल पाटील शेतकरी उपस्तिथ होते. लसीकरणसाठी पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. भास्कर पराडे पाटील याचे सहकार्य लाभले.

## लोककल्याण प्रतिष्ठानची मासिक सभा

सुराज्य/वेळापूर : २५ सप्टेंबर रोजी साईप्रसाद कंपनीच्या गुंतवणूकदारासाठी लढणाऱ्या लोककल्याण प्रतिष्ठानचे मासिक सभा टेंभुर्णी येथे संपन्न झाली. या सभेमध्ये मुंबई येथे सत्र व दिवाणी न्यायालयात चालू असलेल्या साईप्रसादच्या गुंतवणूकदारासाठी वकीलपत्र देण्यासाठी या सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेसाठी महाराष्ट्रातून अनेक गुंतवणूकदार टेंभुर्णी येथे आले होते. सभेचे अध्यक्ष म्हणून बाळू पांडव यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक संजय जानकर यांनी केले. या सभेसाठी विनोद थिटे, रज्जाक जमादार, अर्जुन गव्हाणे, राणी कुलकर्णी, राजेश चव्हाण, दिपक महिंद्रकर, मंगल रोडशेला, तानाजी माने व गूंतवणुकदार यावेळी उपस्थित होते. शेवटी सर्वांचे आभार रशींद तांबोळी यांनी मानले

## पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती साजरी

सुराज्य/अकलूज : अकलूज येथील मोदी निवास येथे एकात्म मानव दर्शनाचे प्रणेते, अंत्योदयाचे उद्गाते, भारतीय जनसंघाचे संस्थापक पंडित दीनदयाल उपाध्याय यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली. त्यावेळी त्यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. व भारत देशाचे लाडके पंतप्रधान मोदीजी यांचे मन की बात हा कार्यक्रम सर्वांनी पहिला व ऐकला. या सोबतच सध्या सुरू असलेल्या सेवा पंधरवड्याच्या निमित्ताने अकलाई मंदिर येथे वृक्षारोपण करण्यात आले. तसेच जम्मू आणि काश्मीर येथे सध्या सामाजिक कार्यक्रमात सक्रिय असलेले निनाद पटवर्धन व सचिन धाइंजे यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी उपस्थित राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे माजी जिल्हा कार्यवाहक सचिनजी शिंदे, भाजप अल्पसंख्याक मोर्चा जिल्हाध्यक्ष मुख्तारभाई कोरबू, भाजपा ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्ष बाळासाहेब वावरे, भाजपा अकलूज शहराध्यक्ष महादेव कावळे, भाजपा युवा मोर्चा व जोशी समाज महाराष्ट्र प्रवक्ते डॉ. अक्षय वाईकर, भाजप अल्पसंख्याक तालुकाप्रमुख राशीदभाई मुलानी, भाजपा तालुका चिटणीस ज्ञानेश्वर शेळके, भाजपा जेष्ठ नेते गोसावी सर, अमर खंडागळे, मनोज साळुंखे, निखिल देवकर, व इतर भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## शिवाजी इंजिनिअरिंग कॉलेजची प्लोरा उद्योगसमूहास भेट

सुराज्य/नातेपुते : नातेपुते येथील नामांकित फ्लोरा फर्निचर उद्योग समूहास गुरुवारी सांगोला येथील शिवाजी इंजिनिअरिंग कॉलेजच्या मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाच्या विद्यार्थ्यांनी भेट दिली व उद्योगातील विविध समस्या जाणून घेतल्या. या वेळी त्या विद्यार्थ्यांच्या सोबत प्रा. पी. जी. पवार, प्रा. सागर साळुंखे उपस्थित होते. फ्लोरा फर्निचर उद्योग सरव्यवस्थापक समूहाचे मोहित जाधव हे सांगोला येथील शिवाजी इंजिनिअरिंग

कॉलेजे या ठिकाणी २०११ ते १२ या वर्षात शालेय शिक्षण घेत होते. त्या वेळी त्यांनी व त्यांच्या समूहाने तयार केलेले ॲडव्हान्स मल्चिंलेअर मशिन तयार करून माजी केंद्रीय कृषिमंत्री शरदचंद्र पवार यांची कौतुकाची थाप मिळविली होती. पुढे जाधव यांनी नातेपुते या ठिकाणी स्वतःचा अद्ययावत फ्लोरा फर्निचर, या नावाने चालू करून काही काळातच त्यांनी व्यवसायात आपले स्थान निर्माण केले. सांगोला येथील शिवाजी विद्यालयाने या आपल्या विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे सत्यात उतरलेले स्वप्न इतर विद्यार्थ्यांना दाखविण्यासाठी विद्यालयातील विद्यार्थ्यांच्या आपल्या मेकॅनिकल समूहाची भेट दिली. यावेळी या समूहाचे स्वागत करण्यासाठी कंपनीचे सरव्यवस्थापक मोहित जाधव, कृषी उत्पन्न बाजार समितीचे मामासाहेब पांढरे, अतुल बावकर, तालुका पंचायत समितीचे सदस्य माऊली पाटील, संतोष आबा वाघमोडे, पप्पू दुधाळ, कंपनीचे मॅनेजर देवा जाधव हे उपस्थित होते.

## आग्राच्या लालकिल्ल्यात डॉ. कोल्हेंची 'गरुडझेप'

सुराज्य/सोलापूर : इतिहासाच्या पानांमध्ये अभिमानाने कोरलेला छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ऐतिहासिक आग्रा सुटकेचा थरार पुन्हा अनुभवण्याची संधी आग्र्याच्या लालकिल्ल्यात मिळाली. निमित्त होते शिवप्रताप 'गरुडझेप' या चित्रपटाच्या प्रमोशनचे. प्रफुल्ल तावरे प्रस्तुत आणि डॉ. अमोल कोल्हे निर्मित हा चित्रपट येत्या ५ ऑक्टोबरला विजयादशमीच्या मुहूर्तावर प्रदर्शित होतोय. तत्पूर्वी या चित्रपटाच्या प्रमोशन करिता गरुडझेपच्या टीमने माध्यम प्रतिनिधींसह आग्रा भेट केली. आग्र्यावाहून सुटका हा शिवचरित्रातील हा महत्त्वाचा अध्याय उलगडून दाखवणाऱ्या शिवप्रताप गरुडझेप' या चित्रपटात डॉ. अमोल कोल्हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या भूमिकेत असून त्यांच्यासोबत यतीन कार्येकर, प्रतीक्षा लोणकर, हरक अमोल भारतीय, शैलेश दातार, हरीश दुधाडे, मनवा नाईक, पल्लवी वैद्य, अजय तपकिरे, रमेश रोकडे, अलका बडोला कौशल, आदी ईराणी, विश्वजीत फडते आदी कलाकारांच्या भूमिका आहेत. या चित्रपटाचे दिग्दर्शन कार्तिक राजाराम केंढे यांनी केले आहे.




# मराठा सेवा संघामुळे खरा इतिहास समोर आला

- आ. संजयमामा शिंदे यांची संघटनेबद्दल प्रशंसा
- कुर्डूवाडीत ३० शिलेदारांचा सन्मान सोहळा

सुराज्य/कुर्डूवाडी

समाजासाठी भुषणावह व्यक्तींचा सन्मान करण्याचे मोठे काम मराठा सेवा संघ करत असून ते कौतुकास्पद आहे. मराठा सेवा संघाने इतिहास पुनर्लेखनाचे मोठे काम केल्याने खरा इतिहास समाजासमोर आला, असे गौरवोद्गार आ. संजयमामा शिंदे यांनी मराठा सेवा संघाच्या वर्धापनदिनानिमित्त आयोजित माढा तालुका मराठा भुषण, प्रबोधनात्मक व्याख्यान व समाजातील गुणवंतांच्या सन्मान सोहळ्यात केले.

मराठा सेवा संघाच्या ३२ व्या वर्धापनदिनानिमित्त माढा तालुका मराठा सेवा संघाच्या वतीने माढा तालुका मराठा भुषण पुरस्कार, प्रबोधनात्मक व्याख्यान व समाजातील गुणवंतांचा सन्मान सोहळा कुर्डूवाडीतील संकेत मंगल कार्यालयात आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आ. संजयमामा शिंदे उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्य रंगभूमी परीनिरिक्षण मंडळाचे सदस्य प्राचार्य डॉ. महेंद्र कदम होते.

ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य डॉ. राजेंद्र दास यांना मराठा सेवा संघाचा पहिला मानाचा माढा तालुका मराठा भुषण पुरस्कार आ. संजयमामा शिंदे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी शिवजन्मोत्सव स्पर्धेतील विजेते, लोकसेवा व राज्यसेवा आयोगाच्या परीक्षेत यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा, समाजातील यशस्वी उद्योजकांचा, गुणवंत कर्मचाऱ्यांचा, तानुबाई बिर्जे पत्रकार सन्मान उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जडणघडणीत मराठा सेवा संघाचे योगदान या विषयावर संभाजीनगर येथील व्याख्याते डॉ. बालाजी जाधव यांचे व्याख्यान झाले.




मराठा समाजाच्या प्रश्नांना ३३ प्रकारात विभागून त्या प्रत्येक प्रश्नांसाठी एक कक्ष उभा करणे आणी तो चालवणे ही सोपी गोष्ट नाही. समाजातून वेळ, बुध्दी, कौशल्य, श्रम व पैसा गोळा करून समाजाला धर्मसत्ता, राजसत्ता, अर्थसत्ता, शिक्षणसत्ता व प्रचार प्रसार माध्यमसत्ता हस्तगत करण्यासाठी दिशा देण्याचे कार्य ॲड. पुरूषोत्तम खेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली मराठा सेवा संघ करत आहे.

**– डॉ. बालाजी जाधव**

### या शिलेदारांचा झाला सन्मान

* **यशस्वी मराठा उद्योजक सन्मान** – प्रशांत चंद्रकांत गिड्डे, वसुदेव अंबादास खंदारे, गोरख खटके, पांडुरंग गोरे, प्रविण चवरे, अतुल पवार, शशिकांत गिड्डे * **स्पर्धा परीक्षेतील यशवंत** – वैभव भाऊराव शिंदे, भुषण उबाळे, केदार बारबोले * **गुणवंत कर्मचारी** – समाधान लोकरे, रूपाली सुर्वे, अभिजित चवरे, अर्चना शिंदे, सुलभा दिडवळ, इंदुमती कदम, * **नीट परीक्षेत यशस्वी विद्यार्थी** – सौरभ महाडिक, ऋषिकेश टोणपे * **तानुबाई बिर्जे पत्रकार सन्मान** – अतुल गवळी, संदीप शिंदे, प्रथमेश पवार.

अध्यक्षपदावरून बोलताना प्राचार्य डॉ. महेंद्र कदम यांनी, ॲड. पुरूषोत्तम खेडेकर यांनी नोकरदार वर्गाचे संघटन करून मराठा समाजात प्रबोधनाचे मोठे काम केल्याचे सांगत ही चळवळ माढा तालुक्यात मराठा सेवा संघ व त्यांचे कक्ष चांगले पध्दतीने वाढवत असल्याचे सांगितले. याप्रसंगी राज्य कर विभागाचे सहाय्यक आयुक्त नितेश कदम, महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी आनंद जाधव, पोलीस उपनिरीक्षक हनुमंत वाघमारे, मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष तात्यासाहेब पाटिल, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष सुरजाताई बोबडे, संभाजी ब्रिगेडचे राज्य कार्यकारिणी सदस्य दिनेश जगदाळे, संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष सचिन जगताप, उद्योग कक्ष जिल्हाध्यक्ष दत्ताजी शिंदे, कृषीभुषण दादासाहेब पाटील, कर्मयोगी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक देवराव लोकरे, मराठा सेवा संघ जिल्हा परिषद कक्षाचे अध्यक्ष अविनाश गोडसे, सचिन खुळे, उद्योजक गोरख खटके-पाटील, जिजाऊ ब्रिगेडच्या तालुकाध्यक्ष निताताई खटके, रत्नमाला शिंदे, संजीवनी आरबोले, शारदा शिंदे जिजाऊ ब्रिगेड कुर्डूवाडीच्या अध्यक्ष अरूणा पाटील, सारिका भांगे, मनिषा गाडे, उषा ढेकळे, विद्या देशमुख उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाध्यक्ष तात्यासाहेब पाटिल यांनी केले तर आभार प्रदर्शन तालुकाध्यक्ष निलेश देशमुख यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तालुकाध्यक्ष निलेश देशमुख, कार्याध्यक्ष शिवाजी गवळी, उपाध्यक्ष रामभाऊ मिटकल, संघटक अरूण जगताप, कुर्डूवाडी शहराध्यक्ष सचिन महिंगडे यांनी परिश्रम घेतले.

## 'माता सुरक्षित तर घर सुरक्षित' अभियान महापालिका राबविणार

सुराज्य/सोलापूर : महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार सोलापूर महानगरपालिकेअंतर्गत नवरात्रोत्सवात दि. २६ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत माता सुरक्षित तर घर सुरक्षित हे अभियान राबविण्यात येणार आहे. माता व गरोदर स्त्रियांसाठी आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे अशी माहिती महापालिका आयुक्त पी शिवशंकर यांनी दिली.

सोलापूर महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये कार्यरत महापालिकेच्या १५ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र व आठ प्रसूती गृह येथे माता व गरोदर स्त्रियांची आरोग्य तपासणी शिबिर होणार आहे. ही शिबिरे दिनांक २६ सप्टेंबर ते ५ ऑक्टोबर २०२२ या कालावधीत राबविण्यात येणार आहे. सोलापूर महानगरपालिकेअंतर्गत या शिबिरात १८ वर्षावरील सर्व माता, गरोदर स्त्रिया यांची आरोग्य तपासणी तसेच प्रतिबंधात्मक आणि उपचारात्मक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे तसेच सुरक्षित व सुदृढ आरोग्यासाठी समुपदेशन करणे हा या अभियानाचा उद्देश आहे. माता व गरोदर स्त्रियांनी या मोहिमेचा लाभ घेऊन आपली आरोग्य तपासणी व इतर अनुषंगिक तपासण्या या मोफत करून घ्याव्यात असे आवाहन सोलापूर महापालिकेचे आयुक्त पी. शिवशंकर यांनी केले.

## सुमित्रा पतसंस्थेने सामाजिक बांधिलकी जपली : स्वरूपाराणी

सुराज्य/अकलूज

ज्या वेळेस ग्रामीण भागात राष्ट्रीय बँका सक्रिय नव्हत्या त्यावेळी सुमित्रा पतसंस्थेने फायद्या-तोट्याचा विचार न करता सामाजिक बांधिलकी जपत कर्ज वाटली. सध्या अडचणीचा काळ असला तरी पुढील २ ते ३ वर्षात पतसंस्थेचला पुर्नवैभव प्राप्त होईल असा विश्वास संस्थेच्या माजी संचालिका व प्रताप क्रिडा मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांनी व्यक्त केला.

सुमित्रा ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या ३४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत

### संस्थेची ३४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा




त्या बोलत होत्या. यावेळी चेअरमन महादेव अंधारे, व्हा. चेअरमन विजय शिंदे, दिपक खराडे, ॲड. नितीन खराडे, विजय दोशी, नारायण फुले, अशोक जावळे, अरूण गुजर, सुभाष दळवी, विकास भरते, सौ. शैलेजा गुजर, विलास भरते, शिक्षण प्रसारक मंडळाचे सहसचिव हर्षवर्धन खराडे, मॅनेजर प्रताप चव्हाण यांच्यासह संस्थेचे संचालक, सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना चेअरमन महादेव अंधारे यांनी संस्थेचा आढावा सादर केला. ते म्हणाले, जयसिंह मोहिते-पाटील यांनी केलेल्या नेतृत्वामुळेच आज चालू वर्षाअखेर संस्थेची सभासद संख्या १०, ०२३ एवढी असून संस्थेकडे ९५, २४, ३०० रूपयांचे भाग भांडवल आहे. संस्थेने स्थापनेपासुन ३४ वर्षात ४६, ५४५ कुटुंबांना १०५५ कोटी रूपयांचा पतपुरवठा केलेला असुन एकुण १५०८ कोटी ६३ लाख वसुल केले आहेत. त्यातील एकुण कर्ज वाटपाच्या फक्त ५. ४०% कर्ज वसुल करावयाचे राहिले आहेत. स्थापनेपासुन संस्थेने ५०८ कोटी १८ लाख वसुल करून ठेवीदारांना ठेव व्याजापोटी ४८२ कोटी ०२ लाख अदा केले आहेत. अशा प्रकारे संस्थेची मागील ३४ वर्षात २८८५ कोटींची उलाढाल झाली आहे.

## सुनेचा छळ; चौघांवर गुन्हा

सुराज्य/सोलापूर : सुनेला मोलकरीण सारखी वागणूक देऊन व तिचा शारीरिक व मानसिक छळ करत कर्ज फेडण्यासाठी एक लाख रुपये घेऊन ये म्हणून तगादा लावल्याप्रकरणी विजापूर नाका पोलीस ठाण्यात चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी नाजिया बाणू सोहेल नदाफ (वय-२५, रा. गरिबी हटाव झोपडपट्टी, चाँदतारा मास्जिद शेजारी, सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून सोहेल इलाही नदाफ, मुमताज इलाही नदाफ, महताब मोहम्मद नदाफ (सर्व रा. कारंजा चौका बुधवार पेठ, अक्कलकोट) निलोफर नासिर नदाफ (रा. ता. भूम, जि. उस्मानाबाद)यांच्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे.

घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक सोनार हे करीत आहेत.




## खैराव-कुंभेज पूल लवकरच सेवेत : आ. शिंदे

सुराज्य/कुर्डूवाडी

माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार मा. श्री. बबनरावजी दादा शिंदे यांचे विशेष प्रयत्नातून सन २०२०मधील शासनाच्या अर्थसंकल्पामध्ये माढा तालुक्यातील सिना नदीवरील खैराव-कुंभेज येथे १५ कोटी रुपये मंजूर झालेल्या पुलाचे काम प्रगती पथावर असून लवकरच हा पूल वाहतुकीसाठी उपलब्ध होणार आहे.

या पुलाच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करणेसाठी माढा विधानसभा मतदारसंघाचे आमदार बबनरावजी दादा शिंदे यांनी खैराव येथे आज भेट दीली. संबंधीत ठेकेदार व सार्व. बांधकाम विभागाचे उप अभियंता नाईकवाडी व कनिष्ठ अभियंता नाझरे यांना सदर पुलाच्या कामा संदर्भात योग्य त्या सूचना केल्या. या वेळी मार्केट कमितीचे उप सभापती मा. सुहास काका पाटील, विठ्ठलराव शिंदे कारखान्याचे संचालक मा. नीलकंठ बापू पाटील, मा. नागटिळक सर, मा. अनिल काका देशमुख, मा. पिंटू नागटिळक, मा. औदुंबर देशमुख सर, मा. तानाजी देशमुख, मा. मदन अलदर, मा. दीपक भोसले, मा. नितीन बापू कापसे, मा. शिवशंकर गवळी, मौजे मानेगाव, खैराव, कुंभेज, धानोरे, कापसे वाडी, यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अमोल नगरातून दुचाकी पळवली

सुराज्य/सोलापूर : अज्ञात चोरट्याने दुचाकी क्रमांक एमएच. १३. बीके. ७९६० ही अमोल नगर भूषण नगर जवळील दि. २२ सप्टेंबर रोजी साडेदहा ते अकरा वाजण्याच्या दरम्यान चोरून नेली. याप्रकरणी विष्णू कृष्णा खडाखडे (वय-३६, रा. एस. आर. पी. एफ कॅम्प, विजापूर रोड) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. घटनेचा पुढील तपास सहाय्यक फौजदार गायकवाड हे करीत आहेत.

## परगावी गेल्यावर चोरट्याने पळविले दागिने

सुराज्य/सोलापूर : परगावी गेल्याचा फायदा घेत अज्ञात चोरट्याने चांदीच्या दागिन्यांसह गॅस टाकी असा एकूण ११ हजार २०० रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना दि. २२ ते २३ सप्टेंबर दरम्यान गंगाधर नगर विष्णुपुरी सोसायटी जुळे सोलापूर येथे घडली. याप्रकरणी रशींद बादशहा शेख (वय-६५, रा. गंगाधर नगर) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी व घरातील सर्व मंडळी घराला कुलूप लावून पुणे येथे त्यांच्या मुलाकडे गेले होते. त्यावेळी अज्ञात चोरट्याने फिर्यादी यांच्या घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश करून घरातील चांदीच्या दागिन्यांसह एक गॅस सिलेंडर टाकी असा मिळून एकूण ११ हजार २०० रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस नाईक हार हे करीत आहेत.

## तुळजापूर रोडवर दुचाकी चालक ठार

सुराज्य/सोलापूर :तुळजापूर रोडवरील कचरा डेपो जवळ अज्ञात वाहनाच्या धडकेने दुचाकी वरील सुरेश काशिनाथ चौधरी (वय ४५ रा. मित्रनगर शेळगी) हे गंभीर जखमी होऊन उपचारापुर्वी मयत झाले. हा अपघात आज रविवारी सायंकाळच्या सुमारास घडला. सुरेश चौधरी हे दुचाकिवरून तामलवाडी ते सोलापूरच्या दिशेने निघाले होते. चव्हाण फर्निचर जवळ अनोळखी वाहनाच्या धडकेने ते गंभीर जखमी झाले होते. त्यांना उपचारासाठी शासकिय रुग्णालयात दाखल केले असता ते वाटेतच मरण पावले.या अपघाताची नोंद जोडभावी पेठ पोलिसात झाली आहे.

## सावळेश्वर येथून चार लाख नव्वद हजारांची चोरी

सुराज्य/मोहोळ :सागर मोटार्स अशोक लैलड शोरूम सावळेश्वर (ता मोहोळ) येथील चार लाख ९० हजाराचा मुद्देमाल चोरांनी लंपास केला.याबाबत मोहोळ पोलीसांनी दिलेल्या माहितीनुसार सावळेश्वर ता मोहोळ येथील सागर मोटार्स अशोक लेंडलेंड कपनीचे शोरूम श्रीकांत साधु घाट रा अंवती नगर सोलापूर हे ब ब्रँच मेनेजर म्हणुन काम करतात ते आठवड्यातुन दोन दिवस शोरूमला भेट देतात या ठिकाणी दिवस पाळी व रात्र पाळी साठी दोघे वॉचमन म्हणुन काम करतात त्यापैकि मल्लीनाथ साळुंखे हे रात्री तेथे असताना शो रुम मधुन अशोक लैलंड च्या २२ गाड्या कंपनी कडून आल्या होत्या त्या पैकि ५ गाड्याचे १४ नवीन डिक्स टायरचे काढून त्याची चोरी करण्यात आली एका डिक्स ची किमंत ३५ हजार रुपये प्रमाणे ४ लाख ९० हजाराचा ऐवज रात्रीच चोरट्यांनी लंपास केला असल्याची फिर्याद श्रीकांत घाट यांनी अज्ञात चोरट्या विरोधात मोहोळ पोलीसात दाखल करण्यात आली

# खराब खतामुळे द्राक्ष बागेचे नुकसान

सुराज्य/मोहोळ

## परवानगी नसलेले खत गोडावून केले सील

खराब खतामुळे माझ्या द्राक्ष बागेचे नुकसान झाले आहे. मला न्याय द्या नाहीतर मी आत्महत्या करेन, असा इशारा नुकसानग्रस्त शेतकऱ्यांने दिल्यामुळे तात्काळ खत दुकानाची तपासणी करून अधिकाऱ्यांनी कारवाईचे आश्वासन दिले.यामुळे मोहोळ शहरातील खतविक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

मोहोळ तालुक्यातील सावळेश्वर येथील प्रदीप आमले या शेतकऱ्याने १७ सप्टेंबर रोजी मोहोळ शहरातील मुख्य रस्त्यावरील दोस्ती कृषी केंद्रातून ००५० महाराष्ट्र केमिकल आणि फर्टीलायझर्स पवई मुंबई या कंपनीचे ५ पोती खत द्राक्ष बागेला टाकण्यासाठी घेतले होते. द्राक्ष बागेमध्ये खत सोडल्यानंतर सदरच्या खताला उग्र वास व चुन्याच्या निवळी सारखा फेस येत असल्याचे आमले यांच्या लक्षात आले. त्यांनी खताचा नमुना घेऊन सोलापुरातील खाजगी लॅब मध्ये सदरचे खत तपासणी केले असता, त्यात केवळ १ टक्का पोटॅश तर संपूर्ण मीठ आढळून आले. त्यांनी यासंदर्भात पुण्याच्या विभागीय कृषी संचालक तंत्र अधिकारी यांच्याकडे तक्रार केली.दोन दिवसानंतर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांनी येऊन प्रत्यक्ष पाहणी करत सदर खताचे नमुने घेतले होते. दरम्यान २४ सप्टेंबर रोजी शेतकरी प्रदीप आमले यांनी मला न्याय नाही मिळाला तर आत्महत्या करेन असे जिल्हाधिकारी मिलिंद शंभरकर व जिल्हा कृषी अधिक्षक बाळासाहेब शिंदे यांना फोनद्वारे सांगितल्यानंतर जिल्हाधिकारी शंभरकर यांनी यासंदर्भात तात्काळ लक्ष घालत कृषी अधीक्षक यांना यासंदर्भात चौकशी करण्याचे आदेश दिले. त्यानुसार रविवारी सकाळीच सोलापूरचे कृषी अधिक्षक बाळासाहेब शिंदे यांचे पथक तक्रारदार आमले यांच्यासह मोहोळ मध्ये धडकले व दोस्ती कृषी केंद्रावर तपासणी केली.

दोस्ती कृषी केंद्राची तपासणी केली असून मंगळवारी त्याबाबत सुनावणी ठेवली आहे. तसेच तेथील नमुने चाचणीसाठी घेतले आहेत. परवानगी नसलेले त्यांचे गोडाऊन सील केले असून सुनावणी मध्ये निश्चित निर्णय होईल.शेतकऱ्यांनी खताच्या संदर्भात संशय आल्यास तक्रार करावी. त्यामुळे खोटी खते विकली जाणार नाहीत. मोहोळ शहरातील सगळ्या कृषी सेवा गोडाऊनची तपासणी करणार आहे.

**– बाळासाहेब शिंदे,** जिल्हा कृषी अधीक्षक, सोलापूर

खराब खतामुळे साडेपाच एकर द्राक्ष बागेचे ४० ते ५० लाखांचे नुकसान झाले असून दोस्ती कृषी केंद्रातून घेतलेल्या खतामध्ये मोठ्या प्रमाणात मीठ आढळून आले आहे, शासनाने नुकसान भरपाई मिळवून द्यावी, जिल्हाधिकारी व जिल्हा कृषी अधीक्षकांना मी फोन केल्यानंतर यंत्रणा हल्ली व दोस्ती कृषी केंद्रावर कारवाई सुरू झाली.

**– प्रदीप आमले,** शेतकरी सावळेश्वर, ता. मोहोळ



## अहोरात्र सक्षमपणे समाजाच्या पाठीशी राहू: भोसले

**सुराज्य/अक्कलकोट :** समाजाच्या विविध अडचणींबाबत आम्ही अहोरात्र सक्षमपणे समाजाच्या पाठीशी राहू असे अभिवचन पश्चिम महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष महादेव महाराज भोसले यांनी दिले. पश्चिम महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष महादेव महाराज भोसले यांच्या हस्ते औराद येथे शाखा फलकाचे अनावरण करण्यात आले या प्रसंगी भोसले बोलत होते. लहुजी शक्तिसेनेचे दक्षिण सोलापुर तालुक्यात मोठे जाळे लवकरच पसरणार आहे . येत्या दहा दिवसात पंधरा शाखेचे नियोजन करणार असल्याची घोषणा यावेळी दक्षीण जिल्हाउपाध्यक्ष तुकाराम गेजगे यांनी केली. माझ्या शेवटच्या श्वासापर्यत मातंग समाज एकजुटी साठी सर्वतोपरी प्रयत्न करणार आहे. लहुजी शक्ति सेनेची संघटनात्मक बाधंणी साठी आहोरात्र झटून संघटन वाढवणार असल्याचे वक्तव्य याप्रसंगी लहुजी शक्ति सेना सोलापुर जिल्हा कोअर कमिटी अध्यक्ष वसंत देडे यांनी केले संघटनात्मक बांधणीसाठी मान्यवरांनी यावेळीवरील विचार व्यक्त केले.या प्रसगी पश्चीम महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष महादेव महाराज भोसले, पश्चिम महाराष्ट्र कार्याध्यक्ष खंडू बनसोडे कार्यकारणी सदस्य अनिल बनसोडे अक्कलकोट तालुका कोअर कमिटी अध्यक्ष हरी देडे विधानसभा अध्यक्ष विकास डोलारे शहर उपाध्यक्ष सोमनाथभाऊ पात्रे शाखा अध्यक्ष राम ऐवळे उपसरपंच अरविदं शेतसंदी, पोलीस पाटील सैपन बेगडे, उपसभापती संदीपटेळळे, तालुका संपर्कप्रमुख शंकर हेगडे ग्रामपंचायत सदस्य हिरांना बनसोडे संजय भाऊ वाघमारे आरपीआय कोषाध्यक्ष दक्षिण कार्याध्यक्ष भरत पारसे तालुका युवक उपाध्यक्ष सुनील जावीर तालुका युवक अध्यक्ष प्रकाश कांबळे सरपंच शांत कुमार गडदे दक्षिण जिल्हा उपाध्यक्ष तुकाराम गेजगे मल्लीकार्जुन केंगारे,खाजप्पा केंगारे,भरत ऐवळे,कंदल गाव ,अजय ऐवळे बिरु जावीर,आकाश भडकुंबे आदि कार्यकर्ते मोठ्या संखेने उपस्थीत होते.

## शिवसेनेच्या उत्तर सोलापूर तालुका प्रमुखपदी संजय पौळ



**सुराज्य/उत्तर सोलापूर :** उत्तर सोलापूर तालुक्यातील गूळवंची येथील संजय पौळ यांची शिवसेने (ठाकरे)च्या तालुका प्रमुखपदी निवड दैनिक सामना वृत्तपत्रातून करण्यात आली. सोलापूर जिल्ह्यातील सर्वात लहान तालुका असणारा तालुका म्हणजे उत्तर सोलापूर परंतु याच तालुक्यातील शिवसेना तालुका प्रमुख पदाची बऱ्याच मोठ्या प्रमाणात रस्सीखेच होती.गेल्या अनेक वर्षांपासून

संजय पौळ शिवसेनेत सक्रिय व एकनिष्ठ आहेत.उपतालुका प्रमुख म्हणून देखील पदभार सांभाळला आहे गुळवंची गावच्या ग्रामपंचायतीवर शिवसेनेची एकहाती सत्ता आणून शिवसेनेच्या शाखाप्रमुखाला सरपंचपदी बसविण्यात मोठे योगदान आहे. बालशिवसैनिक, शाखाप्रमुख, विद्यार्थी सेनेचे तालुका प्रमुख, विभाग प्रमुख,उप तालुका प्रमुख पदी असताना शिवसेनेच्या प्रत्येक आंदोलने मेळावा आणि शिवसेना पक्षाचे ध्येय धोरणे वाढविण्याचा प्रयत्न करीत आहेत. सोलापूर जिल्हा संपर्कप्रमुख अनिल कोकिळ, शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वानकर यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तर सोलापूर तालुका भगवामय करून उत्तर सोलापूर तालुका पंचायत समितींवर शिवसेनेचा भगवा पुन्हा फडकविण्यात येईल असे शिवसेना तालुका प्रमुख संजय पौळ यांनी म्हटले आहे.

## माळशिरस पोलिसात दोघांविरुद्ध सावकारी अधिनियमाचा गुन्हा

**सुराज्य/सोलापूर :** व्याजासहित सर्व रक्कम घेऊन शेतकऱ्याची जमीन बळकवण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी दोघाविरुद्ध सावकारी ऍक्टचा गुन्हा माळशिरस पोलिसात दाखल झाला आहे.ही घटना शिंगोणी (ता. माळशिरस) येथे घडली.

यासंदर्भात कालिदास नामदेव काळेल (वय ५६ रा.शिंगोणी) या शेतकऱ्याने पोलिसात फिर्याद दाखल केली. त्याप्रमाणे पोलिसांनी सुरेश दिनकर गोडसे (रा. शिंगोणी) आणि नवनाथ विलास काळेल (रा.माण जि.सातारा) या दोघा विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. कालिदास काळेल यांनी सुरेश आणि नवनाथ यांच्याकडून २०१६ साली ३ टक्के व्याजाने पैसे घेऊन शेती गहाण ठेवली होती. त्यानंतर त्यांनी व्याजासहित ८ लाख रुपयांची परतफेड फेब्रुवारी २०२२ या दरम्यान केली. आणि गहाण ठेवलेली शेती आपल्या नावावर करावे म्हणून त्यांना सांगितले होते. तेंव्हा दोघांनी आणखीन दीड लाख रुपये दे नाहीतर जमीन देणार नाही. म्हणून त्यांना जीवे ठार मारण्याची धमकी दिली. दरम्यान काळेल यांनी अकलूज येथील सहाय्यक निबंधकाकडे तक्रार दिली होती. त्या अर्जाची चौकशी केल्यानंतर त्यांनी दोघाविरुद्ध तक्रार देण्यास त्यांना सांगितले. अशी नोंद माळशिरस पोलिसात झाली. पुढील तपास हवालदार कणसे करीत आहेत .




## मारुती कसबे आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित !

**सुराज्य/वेळापूर:** माळशिरस तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था मर्यादित माळशिरस या संस्थेच्या वतीने दिला जाणारा आदर्श शिक्षक पुरस्कार २०२२ वेळापूर येथील भवानीनगर जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक मारुती कसबे यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने संस्थेचे माजी चेअरमन हरिभाऊ खरात यांच्या हस्ते हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी संस्थेचे चेअरमन दत्तात्रय चव्हाण, मदिना तांबोळी, माजी चेअरमन विठ्ठलराव काळे ,नितीन बनकर, नवनाथ क्षीरसागर, प्रदीप आवताडे ,तात्यासो करनवर, बाबा धोत्रे, शिक्षक, शिक्षिका उपस्थित होते. मारुती कसबे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल माळशिरस तालुक्यातून अभिनंदन होत आहे.

# उताऱ्यावरील बोजा कमी करण्यासाठी आंदोलन

## आंदोलनात आम आदमी पार्टीची उडी

**सुराज्य/दक्षिण सोलापूर**

मंद्रुप येथील प्रस्तावित औद्योगिक वसाहतीच्या नावे विरोध असणाऱ्या शेतकऱ्यांच्या उताऱ्यावरील बोजा कमी करण्यासाठी मंद्रुपच्या १३६ शेतकऱ्यांनी बेमुदत धरणे आंदोलन सुरू केला आहे. चार दिवसांपासून आंदोलन सुरू असून या आंदोलनाला अखिल भारतीय किसान, शिवसेना, आम आदमी पार्टी व राष्ट्रवादीने पाठिंबा दिला आहे. चार दिवसात प्रांतअधिकारी सुमित शिंदे , अप्पर तहसीलदार राजशेखर लिंबारे व मंद्रुप पोलीस ठाणेचे सहायक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन शेतकऱ्यांशी सकारात्मक चर्चा केली आहे. मात्र, उताऱ्यावरील बोजा कमी करण्याचे लेखी आश्वासन मिळाल्याशिवाय आंदोलन स्थगित करणार नसल्याचे शेतकरी महादेव गुरण्णा कुंभार यांनी सांगितले आहे.




आमदार सुभाष देशमुख यांनी मंद्रुप येथे औद्योगिक वसाहतीसाठी मंजुरी घेऊन संपादित क्षेत्र निश्चित केले . या क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात बागायत शेतीचे प्रमाण अधिक आहे. शिवाय या परिसरात दररोज भाजीपाला विक्री व पशुपालन करून उदरनिर्वाह करणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या अधिक आहे.

या भागातील शेती सुपीक व उपजीविकेसाठी योग्य असल्याने प्रारंभीपासून शेतकरी विरोध करीत आहेत. यामध्ये मेंडगुदले, कुंभार, गुंजाटे, नंदुरे, शेंडगे, तोडकरी यांचा समावेश आहे. शासनाने शेतकऱ्यांच्या विरोधाकडे दुर्लक्ष करून जमीन मोजणीसह इतर प्रक्रिया सुरू ठेवल्याने शेतकऱ्यांमध्ये असंतोष वाढत गेला. शिवाय औद्योगिक वसाहतीस जमीन देणार नसताना उताऱ्यावर औद्योगिक वसाहत बोजा असल्याने शेतकऱ्यांना आर्थिक अडचण येत आहे. शेती खरेदी-विक्री, बँकेचे कर्ज प्रकरण यासाठी शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात अडचण येत आहे. म्हणून शेतकऱ्यांनी सुरुवातीपासून आमदार, जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांना निवेदन देऊन बोजा कमी करण्याची मागणी केली. मात्र, त्याकडे दुर्लक्ष करून शेतकऱ्यांना नाहक त्रास देण्यात येत असल्याची भावना शेतकरीवर्गातून होत आहे.

मागील आठवड्यात ग्रामपंचायतीमधील सत्ताधाऱ्यांनी उद्योगमंत्र्यांना निवेदन देऊन मंद्रुपमध्ये औद्योगिक वसाहत मंजूर करण्याची मागणी केली. यामध्ये पॅनलप्रमुख, ग्रामसेवक व माजी सरपंच यांचा समावेश आहे. या मागणीबद्दल शेतकऱ्यांमधून संताप व्यक्त होत असून शेतकऱ्यांनी एकत्र येऊन मंद्रुप तलाठी व ग्रामपंचायत कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन सुरू केला आहे.

शासनाने कितीही जमीन मोबदला दिला तरी शेतजमीन देणार नाही. शिवाय लवकरात लवकर बोजा कमी करून मिळावा, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

मंद्रुपमधील शेतकरी चार वर्षांपासून उताऱ्यावरील बोजा कमी करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. मात्र शासन त्याकडे दुर्लक्ष करून शेतकऱ्यांना आर्थिक संकटात ढकलत आहे. म्हणून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी दक्षिण सोलापूर आम आदमी पार्टी पाठिंबा देत आहे, असे आपचे दक्षिण सोलापूर कार्यध्यक्ष सचिन व्हनमाने, यांनी सांगितले.

### मागण्या मान्य झाल्याशिवाय माघार नाही

चार वर्षांपासून शासनाकडे बोजा कमी करण्यासाठी पाठपुरावा करीत आहे. तरीदेखील शासनाकडून प्रतिसाद मिळत नाही. आमच्या शेती उताऱ्यावरील बोजा कमी करण्याचे पत्र मिळाल्याशिवाय आंदोलनातून माघार घेणार नाही.

**- प्रवीण कुंभार, शेतकरी.**

### शासनाने शेतकऱ्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये

मंद्रुपमधील औद्योगिक वसाहतीस विरोध असणाऱ्या शेतकऱ्यांनी वारंवार शासनाकडे पत्रव्यवहार करून जमिनीवरील बोजा कमी करण्याची मागणी केली आहे. आमदार सुभाष देशमुख व शासन शेतकऱ्यांच्या मागणीकडे दुर्लक्ष करीत आहेत. शासनाने शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य करून न्याय द्यावे. शेतकऱ्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये.

**- डॉ. शिवानंद झळके, जिल्हाध्यक्ष, अखिल भारतीय किसान सभा.**

# जनगणनेसाठी सरकारला जागे करा

## सरपंच वनिता सुरवसे यांनी दिले अण्णा हजारे यांना निवेदन

**सुराज्य/अक्कलकोट**

**गोगावचे सरपंच वनिता मधुकर सुरवसे यांनी राळेगणसिध्दी येथे आयोजित सरपंच परिषदेच्या चौथ्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमानिमित्त गेले असता, ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णा हजारे यांची भेट घेऊन गावातील विविध कामाबाबत व त्वरित जनगणना होण्याबाबत निवेदन दिले.**



जनगणना होऊन बारा वर्षे लोटली, परंतु आजपर्यंत भारत सरकारच्या माध्यमातून जनगणना करण्यात आलेली नाही, यामुळे ग्रामीण भागातील विकास कामांना फटका बसत आहे. केंद्र सरकारच्या, राज्य सरकारच्या व जिल्हा परिषदेच्या विविध योजना, दलित वस्ती निधी, पंधरा वित्त आयोग अशा अनेक योजनेमार्फत जो निधी दिला जातो तो निधी लोकसंख्येच्या निकषावर दिला जातो, परंतु २०१० नंतर आज आजपर्यंत जनगणना झाली नाही.

जनगणना झाली नसल्यामुळे २०१० च्या लोकसंख्येच्या आधारे सर्व ग्रामपंचायतींना निधी वाटप केला जातो. त्यामुळे सर्व ग्रामपंचायतचे किमान ३० ते ४० टक्के नुकसान होत आहे, त्यामुळे गावच्या विकास कामावर मोठा परिणाम होत आहे.

कारण २०१०च्या तुलनेमध्ये २०२२ ची प्रत्येक गावातील लोकसंख्या ३० ते ४० टक्क्यांनी वाढली आहे. नियमाप्रमाणे २०२०साली जनगणना होणे अपेक्षित होते. परंतु covid-19 मुळे जनगणना पुढे ढकलली, पण आत्ता त्वरित जनगणना करून २०२० पासून प्रत्येक ग्रामपंचायतीला त्यांचा राहिलेला फरक व चालू निधी नवीन जनगणनेप्रमाणे देण्यास सांगावे, याकरिता ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांना सरपंच वनिता सुरवसे यांनी विनंती केली.

अण्णांच्या लगेच लक्षात आले ,अण्णांनी सरपंच सुरवसे यांचे पत्र स्वीकारून तात्काळ पंतप्रधान कार्यालय आणि मुख्यमंत्री कार्यालयाला स्वतः पत्र देणार असे आश्वासन दिले. केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांना त्वरित जनगणना करावीच लागेल त्यासाठी तुम्ही सर्व सरपंच सक्षम राहा. अण्णांनी यावेळी सरपंच सुरवसे यांना आशीर्वादाची थाप दिली. यावेळी सोबत सरपंच सुरवसे यांचे पती मधुकर सुरवसे व सरपंच परिषदेच्या राष्ट्रीय उपाध्यक्षा अश्विनी थोरात उपस्थित होत्या.

## यमाईदेवी नवरात्रौत्सवास आजपासून प्रारंभ

**सुराज्य/उत्तर सोलापूर**

**महाक्षेत्र मार्डी आदिस्थान । महाकालची शक्ति नांदे निदान । तुझ्या दर्शनी मुक्ति होय सर्व लोका । यमाई यमाई असे नित्य घोका ।'**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी तुळजाभवानीची मोठी बहीण असलेल्या व एक हजार वर्षांची परंपरा असलेल्या उत्तर सोलापूर तालुक्यातील श्रीक्षेत्र मार्डी येथील श्री यमाईदेवीच्या शारदीय नवरात्रोत्सवास सोमवार दि. २६ पासून प्रारंभ होत आहे.



श्रीदेवी सप्तशती या ग्रंथाचे रचनाकार महान शिवभक्त श्री मार्कंडेय ऋषी यांची तपोभूमी म्हणूनही मार्कंडेय पुराणात मारोडी या गावाचा उल्लेख आढळतो. त्यामुळे मार्डी या तीर्थक्षेत्राला प्रतीकाशी म्हणून वारसा लाभला आहे. देवी भागवत ग्रंथामध्येही या गावाचा उल्लेख आढळतो. तुळजाभवानीच्या दर्शनानंतर मार्डीच्या यमाईदेवीचे दर्शन घेण्याची परंपरा भाविक पाळतात. तर विवाहानंतर नवदांपत्य वाहूर यात्रेसाठी तुळजापूर नंतर श्रीक्षेत्र मार्डी येथे दर्शनासाठी येतात, हे देखील या स्थानाचे महात्म्य आहे. सोमवार दि-२६ रोजी सकाळी नऊ वाजता देवीची महापूजा व घटस्थापना करण्यात येणार आहे. दररोज पहाटे साडेचार वाजता महापूजा, सकाळी नऊ वाजता नित्यपूजा आणि रात्री आठ वाजता शेजारती हे नवरात्रौत्सव काळातील दिनक्रम आहे. शुक्रवार दि. ३० रोजी ललिता पंचमी असून सोमवार ३ ऑक्टोबर रोजी रोजी सकाळी अकरा वाजता आद्य देवीभक्त रंगनाथ स्वामी मोकाशी यांच्या निवासस्थानी असलेल्या श्री रेणुकादेवी मंदिरात नवचंडी होम होईल. मंगळवार दि. ४ रोजी रात्री दहा वाजता देवीच्या मंदिरात नवचंडी होम होणार आहे. रात्री एक वाजता अजाबली होईल. बुधवार दि. ५ ऑक्टोबर रोजी विजयादशमी दिवशी सायंकाळी सात वाजता सिमोल्लंघनानिमित्त देवीची पालखी मिरवणूक निघणार आहे.

नवरात्रौत्सव काळात भाविकांनी शांतता राखून सहकार्य करण्याचे आवाहन मार्डीचे सरपंच अविनाश मार्तंडे, उपसरपंच काशीनाथ कदम, तंटामुक्त गाव समितीचे अध्यक्ष मनोहर जगताप, ज्येष्ठ नेते विठ्ठल काशीद, शहाजी पवार, मार्डी सोसायटीचे चेअरमन बाबासाहेब पाटील देवस्थान समितीचे अध्यक्ष शिवाजी गुरव, विश्वस्त रंगनाथ गुरव, दत्तात्रय गुरव, पुजारी अशोक गुरव, विकास गुरव, पंकज गुरव यांनी केले आहे.

## नवरात्रीनिमित्त 'श्रीमद्‌भागवत हंसगीत' विषयावर प्रवचनमाला

**सुराज्य/अकलूज**

अकलूज ता. माळशिरस गुरुमाऊली साधना मंदिर या ठिकाणी जेष्ठ किर्तनकार युवकमित्र बंडातात्या कराडकर हे नवरात्र निमित्य दिनांक २६ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीमध्ये श्रीमतभागवत अंतर्गत, हंसगीत या विषयावर संध्याकाळी साडेपाच ते सात या वेळेत प्रवचन सांगणार आहेत. प्रत्येक वर्षी वेगवेगळ्या ग्रंथामधील विषयावर चिंतन सांगितले जाते.

यावेळी आध्यात्मिक चिंतनातील श्रीमतभागवत ग्रंथ त्यांनी घेतला असून या ग्रंथाचे भारतीय संस्कृतीमध्ये अनन्यसाधारण असे महत्व आहे आज अनेक ठिकाणी आपण श्रीमतभागवत ग्रंथ यावर चिंतन ऐकत असतो मात्र या मधील हंसगीत हे चिंतन ऐकण्यासाठी या नवरात्रीच्या कालावधीत अकलूज मधील वैष्णव बांधवांना पर्वणी ठरणार असून याच कालावधीमध्ये २ ऑक्टोबरमध्ये व्यसनमुक्त युवक संघ महाराष्ट्र यांच्या नेतृत्वाखाली किशोरवयीन मुलांसाठी एकदिवसीय मेळावा आयोजित केला जाणार आहे.

## प्रा. डॉ. गेजगे यांना संकल्प फाऊंडेशनचा राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार जाहीर

सुराज्य/अकलूज



संकल्प फाउंडेशन तिरपण, ता. गडहिंग्लजच्यावतीने साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या साहित्यिकांचा साहित्य भूषण हा पुरस्कार देऊन सन्मान केला जातो. संकल्प फाऊंडेशन मार्फत घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय स्पर्धेचे साहित्य पुरस्कार नुकतेच जाहीर करण्यात झाले असून हा मानाचा साहित्य भूषण पुरस्कार समीर गांधी महाविद्यालयाचे प्रा.डॉ.देविदास साधू गेजगे (मराठी विभागप्रमुख) यांच्या कादंबरीस - जीवनदाह डॉ.मन:साद याटोपण नावाने प्रकाशित आहे. हा जाहीर झाल्याने सामाजध सामाजिक संघटनांकडून तसेच संस्थेचे अध्यक्ष उपाध्यक्ष सचिव व सर्व सभासद मंडळाकडून अभिनंदन व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.

जेष्ठ साहित्यिक भारत सातपुते यांना पहिला पुरस्कार जाहीर झाला आहे. शैक्षणिक क्षेत्रातील विविध साहित्यप्रकार समृध्द करण्याच्या दृष्टीकोनातून तसेच साहित्यिकांच्या लेखणीला बळ देण्याच्या उद्देशाने व मराठी साहित्य समृध्द करणाऱ्या लिहित्या हातांचा गौरव करण्याच्या उद्देशाने संकल्प/ परिवाराने या वर्षापासून राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार सुरु केले आहेत.

या पुरस्कारासाठी सर्व साहित्य प्रकारात एकूण १५३ साहित्यकलाकृतींचे प्रस्ताव उपलब्ध झाले होते.संस्थेच्या वतीने पुरस्कार विजेत्यांचा अभिनंदन करण्यात आले असून त्यांच्या शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.

# मंद्रुप पोलीस स्टेशनच्या हद्दीतील नवरात्र मंडळांची बैठक

**सुराज्य/दक्षिण सोलापूर**

**दक्षिण सोलापूर तालुक्यातील मंद्रुप पोलिस स्टेशन हद्दीतील ३८ गावांतील नवरात्र उत्सवाच्या अनुषंगाने मंडळाचे सर्व पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली.**



नवरात्र उत्सव २०२२ च्या अनुषंगाने मंद्रूप पोलीस स्टेशन येथे हद्दीतील गावचे पोलीस पाटील, नवरात्र मंडळाचे अध्यक्ष, पदाधिकारी या सर्वांची उपस्थिती होती यावेळी नवरात्र उत्सवात गावातील मंडळे ही कायदा व सुव्यवस्था राहावी यासाठी पुढीलप्रमाणे सूचना देण्यात आल्यस

नवरात्र मंडळांनी ऑनलाईन परवानगी घेऊन मंडळ स्थापना करण्यात यावेत, तसेच वादग्रस्त बॅनर, पोस्टर देखावे लावण्यात येऊ नयेत, मिरवणुकीत वादग्रस्त गाणी वाजवू नयेत, सोशल मीडियाचा गैरवापर टाळावा, नवरात्र उत्सव मंडळांना २४ तास पहारा देणे.

ध्वनी प्रदूषणाबाबत मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन करण्याबाबत सूचना दिल्या, सुरक्षाचे अनुषंगाने मिरवणुक मार्गातील विद्युत तारा, अरुंद रस्ते, धार्मिक स्थळे याबाबत काळजी घेणे बाबत माहिती दिली, नवरात्र उत्सव २०२२ शांततेत पार पाडणेबाबत आवश्यक त्या सर्व सूचना देण्यात आल्या आहेत.

कोरोनानंतर शासकीय निर्बंध शिथिल झाल्यानंतरचा हा पहिलाच नवरात्र उत्सव साजरा होत आहे. सर्व मंडळांनी उत्सवाचे पावित्र्य व सात्विकता राखत शांततेत उत्सव साजरा करावा. गावातील मंडळांनी दिलेल्या सर्व सूचनांचे पालन करावे.

**- रवींद्र मांजरे. सहा. पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, मंद्रुप.**


## कामगारांचे देणे बाबत जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की - खालील परिशिष्टात नमुद केलेली मिळकत १. श्री विजयकुमार लोणकर उपाध्ये व २. श्री संजय विजयकुमार उपाध्ये यांचे मालकी कब्जे वहिवाटीची मिळकत आहे. सदरची मिळकत सध्या रिकामी आहे. तेथे कोणताही उद्योग व्यवसाय कार्यरत नाही. सदर मिळकतीवर कोणत्याही कामगारांची कायदेशीर देणी प्रलंबित नाही. असा विश्वास आमचे अशिलांना आहे. या उप्परही खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळकतीशी कामगारांच्या कोणत्याही प्रकारच्या कायदेशीर रक्कमा देय्य असल्यास त्यांनी सदरचे नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाचे आत आमचे खालील नमुद पत्यावर अथवा सहाय्यक कामगार आयुक्त, दमाणी अंधशाळा, दमाणी नगर सोलापूर यांचे कार्यालयात लेखी कागदपत्रासह हरकत नोदवावी. वरील मुदतीत कोणाचीही कोणतीही तक्रार, हरकत न आलेस सदरच्या मिळकतीशी अन्य कोणाचाही संबध नाही. व असल्यास तो त्यांनी जाणीवपुर्वक सोडून दिलेला आहे असे समजण्यात येईल.

**परिशिष्ट :-** डी. व सब. डी सोलापूर, शहर सोलापूर, सोलापूर महानगरपलिकेच्या हद्दीतील बुधवार पेठ, येथील मिळकत यांसी टी.पी. नं. ४, सि.स. नं. ८९२८/१-१+२, फा प्लॉट नं ३६ यांचे एकूण क्षेत्र १२,२५५ चौ.मी. सदरची मिळकत १. श्री. विजयकुमार लोणकर उपाध्ये व २. श्री. संजय विजयकुमार उपाध्ये यांचे मालकीची आहे. येणेप्रमाणे मिळकत हा या जाहीर नोटीसीचा विषय आहे. येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली. ता. २५/०९/२०२२

सही/- **प्रकाश सु. जन्नु,** ॲडव्होकेट
रा. फ्लॅट नं. ६ मरगु विहार, न्यु पाच्छा पेठ,
सोलापूर मोबाईल-९४२२०६५९५३
१. श्री विजयकुमार लोणकर उपाध्ये व
२. श्री संजय विजयकुमार उपाध्ये तर्फे ॲडव्होकेट


CMYK



## उदयसिंह मोहिते-पाटील यांच्या जयंतीनिमित्त सामाजिक उपक्रम

सुराज्य/अकलूज : ग्रामीण भागात उद्योगांना प्रोत्साहन देऊन नवनवीन व्यवसायातून युवकांना प्रोत्साहन देणाऱ्या तसेच समाजसेवेत अनमोल योगदान देणाऱ्या उद्योगमहर्षि कै. उदयसिंह मोहिते-पाटील यांच्या ६२ व्या जयंती निमित्त विविध सामाजोपयोगी उपक्रम राबवून अभिवादन करण्यात आले. श्री क्षेत्र आनंदी गणेश येथील कै. उदयसिंह मोहिते-पाटील यांच्या शक्तीस्थलास माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते-पाटील यांच्या उपस्थितीत मोहिते-पाटील परिवार व विविध संस्थांचे पदाधिकारी व नागरीकांनी अभिवादन केले. यावेळी कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापती मदनसिंह मोहिते-पाटील, शिवशंकर बझारच्या चेअरमन श्रीमती स्वयंप्रभादेवी मोहिते-पाटील, आमदार रणजितसिंह मोहिते पाटील, सौ. सत्यप्रभादेवी मोहिते-पाटील, भाजपा नेते धैर्यशील मोहिते पाटील, पं.स. सदस्य अर्जुनसिंह मोहिते-पाटील, शिवरत्न उद्योग समुहाचे चेअरमन किर्तीध्वजसिंह मोहिते-पाटील, बझारच्या माजी अध्यक्षा ईश्वरीदेवी मोहिते-पाटील, जिल्हा परिषद सदस्या स्वरुपाराणी मोहिते पाटील, माजी सरपंच शिवतेजसिंह मोहिते पाटील, देवन्या मोहिते-पाटील यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी, अधिकारी व नागरीक उपस्थित होते. सालाबाद प्रमाणे याही वर्षी अकलूज-माळेवाडी परिसरातील सर्व जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना कै. उदयसिंह मोहिते-पाटील जयंती समारंभ समितीच्या वतीने स्नेहभोजन देण्यात आले. यामध्ये २५०० विद्यार्थी-विद्यार्थीनी व शिक्षकांचा सहभाग होता. तसेच श्री विजय गणेशोत्सव मंडळ ट्रस्ट, शंकरनगर अकलूज यांनी आयोजित केलेल्या खुल्या व व्यवसायिक चित्रकला स्पर्धेचे उद्घाटन माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील, सौ. सत्यप्रभादेवी रणजितसिंह मोहिते पाटील, शिवतेजसिंह मोहिते पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी पं. स. सदस्या फातिमा पाटावाला, स. म. कारखान्याचे कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले, ॲड. नितीनराव खराडे, सचिव अभयसिंह माने-देशमुख यांच्यासह विविध संस्थांचे पदाधिकारी व स्पर्धक उपस्थित होते.



## हिंदी भाषेतून रोजगाराच्या व्यापक संधी : डॉ. पवार

सुराज्य/अकलूज : हिंदी भाषेचा सर्वांगिण अभ्यास केला तर लेखक, कवी, अनुवादक, सिनेमा क्षेत्र, पत्रकारिता क्षेत्र अशा विविध क्षेत्रात काम करण्याची संधी मिळते. भाषा विचारांचे संप्रेषण करते. त्यामुळे कोणतीही भाषा चांगली किंवा वाईट नसते. यातून रोजगाराच्या संधी मिळतात, असे प्रतिपादन अइंदापूर येथील आर्ट्स कॉमर्स आणि सायन्स महाविद्यालयाच्या हिंदी विभाग प्रमुख डॉ सीताबाई पवार यांनी केले. अकलूज येथील शंकरराव मोहिते महाविद्यालयात हिंदी दिवस निमीत्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. दत्तात्रय बागडे होते. यावेळी शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या एम. ए. हिंदी गुणवत्ता यादीमध्ये प्रथम क्रमांक आणि सुवर्ण पदक पटकावणारा विभागाचा विद्यार्थी विनोद मोहिते तसेच त्याचे शेत मजूरी करणारे आई-वडील शहाजी मोहिते व सौ. साळूबाई मोहिते यांचाही सत्कार याप्रसंगी करण्यात आला. या कार्यक्रमाला हिंदी विभाग प्रमुख डॉ. अपर्णा कुचेकर, प्रा. निवृत्ती लोखंडे, डॉ. बाळासाहेब मुळीक, प्रा. दादासाहेब कोकाटे प्रा. स्मिता पाटील, कार्यालयीन अधीक्षक युवराज मालुसरे यांच्यासह बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सलिम शेख आणि सुरेश बनपट्टे, नदाफ, गणपत लोंढे, पोतदार यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संपूर्ण नियोजन बी. ए. भाग एकच्या विद्यार्थ्यांनी केले. प्रास्ताविक राजू धनवडे याने, आभार प्रदर्शन संतोष समिंदर याने तर सुत्रसंचलन रेखा कारंडे हिने केले.




## नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त श्रीपूर येथे वृक्षारोपण

सुराज्य/श्रीपूर : श्रीपुर तालुका माळशिरस येथे देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टीच्या वतीने देशभर पंधरवडा साजरा केला जात आहे. त्यानिमित्त श्रीपुर येथील निदान हॉस्पिटल येथे भारतीय जनता पार्टी प्रज्ञा सेल यांच्या वतीने भाजपाचे जिल्हा संघटन चिटणीस धैर्यशील मोहिते पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करून पंधरवडा साजरा करण्यात आला. यावेळी भाजपा प्रज्ञा सेल तालुका अध्यक्ष डॉक्टर हरिश्चंद्र सावंत पाटील यांच्या हस्ते धैर्यशील मोहिते पाटील यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी पंधरवडाची माहीती अमित पुंज यांनी दिली. या कार्यक्रमाला सुरज मस्के भाजपा तालुका सरचिटणीस, महाळुंग श्रीपुर नगरपंचायतीचे उपनगराध्यक्ष भीमराव रेडे पाटील, कारखाना संचालक व नगरसेवक नानासाहेब मुंडफणे, अशोकराव चव्हाण, नगरसेवक निनाद पटवर्धन, तानाजी भगत, सोमनाथ मुंडफणे, तसेच मोहसीन पठान, डॉ. संजय लाटे, जालिंदर लोखंडे, माजि जि प सदस्य अरुण तोडकर, अरुण पवार, राजू मामा जाधव, रतनसिंह राजपूत, युनियनचे अनंत जाधव, संजय पवार, जयकुमार जाधव, संदीप घाडगे, नागेश भोसले, सुहास गाडे, डॉ. जावेद मुल्ला, डॉ. विजय डहाळे, डॉ. जितेंद्र गायकवाड, डॉ. भारत गायकवाड, डॉ. प्रमोद पवार, अभिनंदन गायकवाड, असिफ शेख, भालचंद्र शिंदे, रमेश देवकर, बजरंग भोसले, रशींद शेख, राहुल जगताप, मानसिंग रेडे, संजय पाठक, सचिन सावंत, गोटू देऊरकर, भारत रणसिंगे, शोभा मनोहर, कल्पना कुलकर्णी, सौ. सोनाली सुमंत, सौ. सीमाताई भोसले, शितल मिस्कर, माधुरी खुणे, स्नेहल बनसोडे, माऊली भोसले, बाळासाहेब कमते, कल्याण रजपूत, अमोल बनसोडे, अनिकेत पवार, अनिल सुरवसे, लखन रेडे, बंडू कोकीळ, शंकर लोंढे, अमोल मिसाळ, नितीन मिस्कर, यांच्यासह भाजपाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माढा तालुक्यात लंम्पी लसीकरण मोहिमेला वेग

### २० हजार जनावरांचे लसीकरण

### १४ जनावरांना बाधा; एकाचा मृत्यू

सुराज्य/कुर्डूवाडी



देशभरात जनावरांना होत असलेल्या लंम्पी या आजारावरील नियंत्रणात उपलब्ध असलेली लस राज्यभरात सर्वत्र जनावरांना देत असतानाच माढा तालुक्यात देखील लसीकरणाच्या मोहिमेला माढा तालुका पंचायत समिती व पशुधन विकास अधिकारी यांच्या मार्फत या मोहिमेला तीव्र वेग देण्यात आला असून कालपर्यंत तालुक्यात ३५००० लस उपलब्ध झालेली होती तर वीस हजार जनावरांना लसीकरण पूर्ण केल्याची माहिती पशुधन विकास अधिकारी विक्रांत बागल यांनी दैनिक स्वराज्याला बोलताना दिली.

माडा तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा पंचायत समितीचे सदस्य सुरेश चंद्रकांत बागल यांनी पंचायत समितीकडे व प्रशासनाकडे मागणी केली होती, की जास्तीत जास्त जनावरांना लसीकरण लवकरात लवकर उपलब्ध करून देण्यात यावे, सुरेश बागल यांनी घेतलेल्या पुढाकारामुळे भोसरे जिल्हा परिषद गटातील १३८८ जनावरांना काल रविवार सायंकाळी पाच वाजेपर्यंत लसीकरण करण्यात आले होते.

माढा तालुका पंचायत समितीच्या वतीने पशुधन विकास अधिकारी डॉक्टर विक्रांत बागल व विश्वनाथ जगाडे या दोघांकडुन ही रविवार या सुट्टीच्या दिवशी देखील परिसरातील जनावरांना मोफत लसीकरण मोहिमेला गावातील वाड्या वस्त्या वरील जनावरांना लसीकरण करण्यासाठी परिश्रम घेतले जात आहेत.

माढा तालुक्यात आत्तापर्यंत वीस हजार जनावरांना लसीकरण करण्यामध्ये पशुसंवर्धन व पशुधन विभागाला आतापर्यंत यश आले असून उर्वरित जनावरांना देखील काही दिवसातच लसीकरण मोहीम पूर्ण करू असे डॉक्टर बागल व डॉक्टर जगाडे यांनी दैनिक स्वराज्य ला बोलताना माहिती दिली. माढा तालुक्यात १४ जनावरांना लंम्पी रोगाची लागण झालेली होती तर एक जनावर दगावले होते. भोसरे गटात लसीकरण मोहिमेचा शुभारंभ करताना माढा तालुका पंचायत समितीचे सदस्य व माढा तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे सदस्य तथा हमाल पंचायतीचे अध्यक्ष सुरेश बागल, ज्योतीराम बागल, मनोहर बागल, भजनदास बागल, विजयकुमार बागल पशुधन विकास अधिकारी डॉ विक्रांत बागल, डॉ विश्वनाथ जगाडे आदी उपस्थित होते.

### सामाजिक कार्यकर्ते व सदस्य पदाधिकाऱ्यांनी संपर्क साधावा

तालुक्यातील शेतकऱ्यांनी व दुग्ध व्यावसायकिांनी घाबरण्याचे कारण नाही. या रोगावर नियंत्रण मिळवण्यात प्रशासनाला यश मिळाले असुन लसीकरण मोहिम देखील वेगात सुरू आहे. आमदार बबनदादा शिंदे व आमदार संजयमामा शिंदे तसेच सभापती विक्रमसिंह शिंदे, बीडीओ डाँ संताजी पाटिल यांनी देखील वेळोवेळी सतत सुचना दिल्या आहेत. परिसरात ज्या जनावरांना लस मिळालेली नाही त्यांनी पशुधन विकास विभागाला पंचायत समिती कुर्डूवाडी येथे संपर्क साधावा एका दिवसात तेथे लस पुरवली जाईल. असे डॉ. विक्रांत बागल यांनी सांगितले.

## नवरात्रनिमित्त पंढरीत संगीत महोत्सव

सुराज्य/पंढरपूर : नवरात्र महोत्सव निमित्त प्रतिवर्षी प्रमाणे यंदा देखील श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीच्या वतीने नवरात्र संगीत महोत्सवाचे आयोजन करण्यात आले असून या सहा दिवसात विविध मान्यवर आपली सेवा सादर करणार असल्याची माहिती समितीचे व्यवस्थापक बालाजी पुदलवाड यांनी दिली.

नवरात्र निमित्त श्री रूक्मिणी मंडपात विविध महिला भजनी मंडळ आपली सेवा करणार आहेत. तर दि. २७ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर या काळात राज्यातील विविध नामांकित कलाकारांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये २७ रोजी मंजुषा पाटील यांचे शास्त्रीय व अभंग गायन, २८ रोजी अपर्णा केळकर व संजय गरूड यांची अभंगवाणी, २९ रोजी पद्माकर कुरकुटे यांचा भावगीत व भक्तीगीताचा तेजोमय नादब्रह्म, ३० रोजी धनंजय जोशी यांचे शास्त्रीय संगीत व नाट्यगीत, दि. २ ऑक्टोबर रोजी सुशील कुलकर्णी यांची मैह्मील सप्तसुरांची तर ४ रोजी आनंद माडगुळकर, डॉ. राधा मंगेशकर, मनिषा निश्चल व जितेंद्र अभ्यंकर हे गदिमा, सुधीर फडके व मंगशेकर यांची गीत सादर करणार आहेत.

सदर सर्व कार्यक्रम संत तुकाराम भवन येथे रात्री साडे सात ते दहा वाजे पर्यंत होणार असून याचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन श्री विठ्ठल रूक्मिणी मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

मानेगावच्या नवदुर्गांचे धाडस...

## दारु विक्रेत्यांची नावे थेट पोलीस अधिक्षकांच्या टेबलवर

### मिशन परिवर्तन राबवण्याची गरज

सुराज्य/कुर्डूवाडी

माढा तालुक्यातील मानेगाव हे लोकसंख्येने व भौगोलिक आणि राजकिय दृष्ट्या नावाजलेलं गाव, मानेगाव तसं पाहिलं तर बागायती क्षेत्र असल्याने येथे समृध्दी नांदत असताना अचानक गावात दारु ची दुकाने वाढत गेल्याने येथील माय माऊलीच्या संसारात दारुडी नावाची जनु काय सवतच आली. आणि मग पती परमेश्वर रोज दारु पिऊन येणे व संसाराची वरात रस्त्यावर आणणे हा नित्यक्रम रोजचाच होऊ लागला. पण या वर कुणी तरी लगाम घातला पाहिजे, गावातील पुढाऱ्यांनी गटातील मतदान कमी व्हायची भिती वाटायला लागली म्हणुन पुढाऱ्यांनी याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले. पण नवरात्री महोत्सव सुरु असताना शांत बसेल ती मानेगावची नवदुर्गा कसली? प्रमोदिनी लांडगे या देशाचे माजी केंद्रिय कृषीमंत्री शरद पवार यांच्या विचारांनी चालणारी गावातील एक सुजान नागरिक म्हणुन पुढे आली.

दारु विक्रेत्यांचा आपल्याला पुढे मागे त्रास होऊ शकतो? याचा कसलाही विचार न करता प्रमोदिनी यांनी थेट सोलापुर पोलिस अधिक्षक तेजस्विनी सातपुते यांचे कार्यालय गाटले अन लेखी निवेदनाच्या माध्यमांतुन गावातील दारु विक्रेत्यांची थेट नावेच पोलिस अधिक्षकांच्या टेबलवर ठेवली.

माढा शहरापासुन अवघ्या पाच सात किमी अंतरावर असलेलं जिल्हा परिषद गटातील मुख्य मानेगाव या गावातील दारु माफियांवर सोलापुर जिल्हा पोलिस दल आत्ता महिलांच्या तक्रारीवरुन कोणती कारवाई करणार याकडे जिल्ह्याचे लक्ष वेधले आहे. यावेळी सुजाता जगताप, सीमा राऊत उपस्थित होते.




### ग्रामिण भागात सातुपुतेंना मीशन परिवर्तनची 'तेजस्वी' संधी

सोलापुर जिल्ह्याच्या पोलिस अधिक्षक तेजस्विनी सातपुते यांनी सोलापुर जिल्ह्यात दारु विक्री करणाऱ्या अनेक कुटूंबाना मिशन परिवर्तन च्या माध्यमांतुन दारु विक्रितीतुन बाजुला करित इतर नविन लोकहिताच्या व्यावसायात आणले. या कार्यासाटी सातपुते यांना राष्ट्रिय राज्य पातळीवर दखल घेत पुरस्कार देखील मिळाले. मानेगाव येथील प्रमोदिनी लांडगे या नवदुर्गेने केलेली तक्रार ही सातपुते यांच्यासाटी महत्वाची आहे. कारण माढा परिसरात दारु विक्रीतुन परावृत्त करित मिशन परिवर्तन करण्याची नामी तेजस्वी व ओजस्वी संधी पो. अधिक्षक सातपुते यांना आहे.

## चिरके माळ ते पाकणी अतिक्रमण काढा

सुराज्य/उत्तर सोलापूर : उत्तर तालुक्यातील कोंडी येथील चिरके माळ ते पाकणी रस्त्यावर स्थानिक लोकांनी अतिक्रमण केलं आहे. करण्यात आलेले अतिक्रमण तावरीत काढण्यात यावे असी मागणी गणेश नीळ यांनी उत्तरचे तहसीलदार जयवंत पाटील, गटविकास अधिकारी यांना केली आहे.

या निवेदनात शेतजमीन गट क्रमांक २४/२, २४/३ व गट २७ या जमिनी लगत आहे. ग्रामपंचायतिचे मालकीचे गायरान आहे. गावातील लोकांनी बेकायदेशीर अतिक्रमण बांधकाम केलं आहे. वहिवाटीच्या पक्क्या रस्त्यावर देखील अतिक्रमण करुन जागा बळकावली आहे. शेतकऱ्यांना शालेय विद्यार्थ्यांना व परिसरातील राहिवासीयांना अनेक अडचणी निर्माण होत आहे. यावेळी अमर भोसले, सुनील भोसले उपस्थित होते.




## एक लाख वह्या वाटपाचा उपक्रम कौतुकास्पद : स्वामी

सुराज्य/अक्कलकोट

समाज उपयोगी एक लाख वह्यां वाटपाचा सागर सिमेंटने उचलेला विडा कौतुकास्पद आहे. श्रीमंत मुलांपेक्षा गरिबीचे झळ भोगलेल्या गरीब मुलांना वह्यांचे महत्व जास्त कळते, सागर सिमेंटच्या चांगल्या उपक्रमाला माझ्या सदिच्छा असतील, अशा पध्दतीच्या भावना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी यांनी व्यक्त केले.

सागर सिमेंटच्या वतीने द. सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे येथील शिक्षण महर्षी कै. कमळे गुरुजी यांच्या जीवन विकास प्रशालेत विद्यार्थ्यांना वह्यां वाटप कार्यक्रमाप्रसंगी ते बोलत होते.

सागर सिमेंटच्या वतीने दरवर्षी ग्रामीण भागातील शालेय मुलांना एक लाख वह्यांचे वाटप करण्यात येते.

याप्रसंगी अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मतराव जाधव सुध्दा सागर सिमेंटचे बद्दल भरभरून बोलले. व्यावसायिक क्षेत्रातील एका खाजगी सिमेंट कंपनीने सामाजिक जाणिवेतून एवढ्या मोठ्या सामाजिक कार्याचा उचलेला विडा निश्चित वाखाणण्याजोगी आहे.

सागर सिमेंट आणि एम. के. फाउंडेशनचे सामाजिक कार्य पाहून मी भारावून गेलोय, येणाऱ्या काळात आपल्या सामाजिक कार्यात माझा सहभाग असेल, आणि सहकार्य ही असेल, अश्या पध्दतीच्या भावना जाधव यांनी व्यक्त केले. याप्रसंगी जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप स्वामी, एम. के. फाउंडेशन तथा सागर सिमेंटचे मुख्य व्यवस्थापक महादेव कोगनुरे, अप्पर पोलीस अधीक्षक हिम्मतराव जाधव, जिल्हापरिषदेचे वित्त व लेखाधिकारी अभयसिंग पवार, महादेव पाटील, हणमंत पुजारी, राधाकृष्ण पाटील, भैरण्णा भैरामडी, सरपंच चिदानंद कोटगोंडे, परिवहन महामंडळाचे विलास राठोड, मुख्याध्यापक नदाफ आदींसह शिक्षकवर्ग आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जातिवाचक शिवीगाळप्रकरणी अटकपूर्व जामीन मंजूर

सुराज्य/अकलूज : जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी डॉक्टर सोमनाथ बोराटे यांना माळशिरस येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्री एम. एन. पाटील साहेब यांनी अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे.

उघडेवाडी, वेळापूर ता. माळशिरस येथे पॅरामेडिकल कॉलेजमधील भागीदारीचे पैशाचे कारणावरून दिनांक ३१/ ८ /२०२२ रोजी रात्री साडेअकरा वाजता घरी येऊन जातीवाचक शिवीगाळ केल्याची फिर्याद वेळापूर पोलीस ठाण्यात गुन्हा राजि. नंबर २४५/ २०२२ नुसार देण्यात आली होती, त्याप्रमाणे डॉक्टर सोमनाथ बोराटे यांचे विरोधात ट्रॉसिटी नुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर ड. सुमित सावंत यांचे मार्फत त्यांचा अटकपूर्व जामीन अर्ज माळशिरस न्यायालयात दाखल करण्यात आला होता. त्यावेळी गुन्हा दाखल करण्यात झालेला उशीर, एफ आय आर मधील त्रुटी व प्रथम दर्शनी आरोपी विरुध्द ट्रॉसिटी गुन्हा दिसून येत नसल्याचा ड. सुमित सावंत यांनी केलेला प्रभावी युक्तिवाद ग्राह्य धरून माळशिरसचे अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्री एम. एन. पाटील यांनी आरोपीचा अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे.

# अन्नछत्र मंडळाच्यावतीने उद्या लम्पी लसीकरण शिबिर

सुराज्य/अक्कलकोट

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांचे पुत्र प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली मंगळावर दिनांक २७ सप्टेंबर रोजी सकाळी १० वा. न्यासाच्या वतीने पशुवैद्यकिय दवाखाना, राजे फत्तेसिंह क्रिडांगण शेजारी, स्टेशन रोड येथे तालूक्यातील गोवंशीय जनावरांना लम्पी चर्मरोगाचे लसीकरण शिबीराचे आयोजन करण्यात आल्याचे माहिती मंडळाचे सचिव शामराव मोरे यांनी दिले आहेत.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाकडून नेहमीच सामाजिक बांधिलकी जपत संकट काळात मदत करण्याची भूमिका घेतली आहे. सध्या देशात व राज्यात गेल्या एक महिन्यापासून गोवंशीय जनावरांना लम्पी चर्मरोग झपाट्याने पसरत आहे. लम्पी हा रोग आटोक्यात आणण्यासाठी अक्कलकोट तालुक्यातील पशुधन व शेतकऱ्यांचे रोजगार वाचविण्यासाठी लसीकरण मोहीम न्यासाने हाती घेतले आहे.

सोलापूर जिल्यात सदर रोगाची लागण ही माळशिरस, सांगोला, माढा या तालुक्यातील जनावरांना झाली आहे. सदरच्या तालुक्याची परिस्थिती लक्षात घेऊन अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांचे पुत्र प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील पशु-पालक शेतकऱ्यांच्या हितार्थ सदरच्या शिबिराचे आयोजन करण्यात आल्याचे शामराव मोरे यांनी सांगितले.





अक्कलकोट तालुक्यात जनावरांचा धोका टाळण्यासाठी व लम्पीला हद्दपार करण्यासाठी प्रतिबंध शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन न्यासाच्या वतीने करण्यात आले आहे. यापूर्वी देखील न्यासाने राज्य, राष्ट्र यावर नैसर्गिक संकट आले त्याकाळात मदती करिता पुढाकार घेतले आहे. गेली ३५ वर्षे अविरतपणे अन्नदानाचे स्वामीकार्य करणारे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ हे न्यास संपूर्ण देशात ख्यातनाम आहे.

यापूर्वी कोरोनाचे पार्श्वभूमीवर दोन्ही लॉकडाऊन कालावधीत सामाजिक बांधिलकी जपत ह्या न्यासाने शहर व ग्रामीण भागात अन्नदान सेवा सलग ७ ते ८ महिने केली आहे. कोविड सेंटर मधील कोरोना रुग्णास सलग ५ ते ६ महिने दैनंदिन नाष्टा, चहा व जेवण पुरवठा केले आहे. तसेच शहरात सॅनिटायजर फवारणी करणे मोफत मास्क वाटप इ. उल्लेखनीय कार्य केले आहे. न्यास गरीब व गरजवंताना वैद्यकिय व शैक्षणिक मदत करीत असते. त्याचप्रमाणे जळीतग्रस्त, भूकंपग्रस्त व पूरग्रस्तांना तातडीचा मदतीचा हात देते. १९९३ च्या किल्लारी येथील महाविनाशकारी भूकंपाचे वेळेस महिनाभर दररोज ट्रकभरून अन्न भूकंपग्रस्तांना पाठविण्यात आले. याबरोबरच २०१४ ला अक्कलकोट ग्रामीण भागातील खानापूर, तडवळ या भागातील पूरग्रस्तांना ८ दिवस मदत पुरविण्यात आली. २०१९ ला सांगली व कोल्हापूर येथील पूरग्रस्तांना व २०२१ च्या पूर परिस्थितीत चिपळूण येथील पूरग्रस्तांना ट्रक भरून जीवनावश्यक साहित्य व अन्नधान्य शिधा पाठविण्यात आला.

अक्कलकोट शहरातील गरजू, वृध्द, दिव्यांग, निराधार लोकांसाठी समर्थ महाप्रसाद सेवेच्या माध्यमातून दोन्ही वेळचे जेवण डब्यातून पुरविण्यत येत आहे. हे न्यास सामाजिक धार्मिक, सांस्कृतिक, क्रीडाविषयक, आरोग्य, पर्यावरणपुरक, वृक्षारोपण-वृक्षसंवर्धन, आपत्कालीन व्यवस्थापन इ. उपक्रम सदैव राबवित असते.

# सचिन पायलट होणार राजस्थानचे नवे मुख्यमंत्री?

## काँग्रेस आमदारांची बैठक

✔ सुराज्य/राजस्थान

**राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेलहोत यांनी काँग्रेस अध्यपदासाठी निवडणूक लढणार असल्याचं स्पष्ट केलं आहे. त्यानंतर राजस्थानमधील राजकीय घडामोडींना वेग आला आहे. रविवार (२५ सप्टेंबर) रोजी राजस्थान काँग्रेसच्या आमदारांची बैठक बोलावण्यात आली आहे. या बैठकीत नवा मुख्यमंत्री कोण होणार, यावर चर्चा होण्याची शक्यता आहे.**




काँग्रेसचे महासचिव आणि राजस्थानचे प्रभारी अजय माकन, ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन खर्गे यांच्या नेतृत्वाखाली आमदारांची बैठक होणार आहे. दरम्यान, शुक्रवारी अशोक गेहलोत यांनी म्हटलं की, काँग्रेस अध्यपदासाठीने निवडणूक लढणार आहेत. अध्यक्ष झाल्यानंतर कोण मुख्यमंत्री होणार? याचा निर्णय पक्ष घेईल. मात्र, गेहलोत यांच्यानंतर काँग्रेसचे नेते सचिन पायलट की अन्य कोण? मुख्यमंत्रीपदी होणार हे पाहावे लागणार आहे.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, शनिवारी अजय माकन यांन काँग्रेसच्या हंगामी अध्यक्षा सोनिया गांधी यांची भेट घेतली होती. या भेटीत राजस्थानच्या राजकीय परिस्थितीवर भाष्य करण्यात आलं. तर, सचिन पायलट यांनी शुक्रवारी विधानसभा अध्यक्ष सी. पी. जोशी आणि काही आमदारांसोबत चर्चा केली. सचिन पायलटच मुख्यमंत्रीपदाचे प्रमुख दावेदार असल्याचं सांगण्यात येत आहे. तसेच, सी. पी. जोशी यांच्याही नावाची राजस्थानमध्ये चर्चा सुरू आहे.

# मागणी करूनही गृहमंत्रीपद मिळाले नाही

## राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकारिणी बैठकीत अजित पवारांची खंत

✔ सुराज्य/मुंबई

**राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर गृहमंत्री करावे, अशी मागणी केली. मला उपमुख्यमंत्री करण्यात आल्यानंतरही मी वरिष्ठांकडे गृहमंत्रीपदाची मागणी केली होती. मात्र, अनिल देशमुखांकडे गृहमंत्रीपद देण्यात आले. देशमुख यांच्यानंतर दिलीप वळसे-पाटील यांच्याकडे ही जबाबदारी वरिष्ठांनी सोपविली, अशी खंत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते, माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या जाहीर मेळाव्यात व्यक्त केली. गृहमंत्री झालो तर मी कोणाचे ऐकणार नाही, अशी भीती कदाचित वरिष्ठांना वाटत असेल. त्यामुळे मला गृहखाते दिले नसावे, असेही अजित पवार यांनी सांगितले.**

राष्ट्रवादी काँग्रेसची शहर कार्यकारिणीची बैठक शुक्रवारी पुण्यात आली. या बैठकीच्या वेळी शहरातील आठही विधानसभा मतदारसंघाचा आढावा घेण्यात आला. खासदार ॲड. वंदना चव्हाण, आमदार सुनील टिंगरे, आमदार चेतन तुपे, शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांच्यासह आजी-माजी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. या बैठकीच्या वेळी एका कार्यकारिणी पदाधिकाऱ्याने राज्यात पुन्हा सत्ता आल्यानंतर अजित पवार यांनी गृहमंत्रीपद घ्यावे, असे सांगितले. त्यावर बोलताना मागणी करूनही गृहमंत्री पद मिळाले नाही,



अशी खंत अजित पवार यांनी व्यक्त केली.

राज्यात सत्ता आल्यानंतर गृहमंत्रीपदाची मागणी केली, मात्र अनिल देशमुख यांना गृहमंत्री करण्यात आले. अनिल देशमुखानंतर मी पुन्हा गृहमंत्रीपदाची मागणी वरिष्ठांकडे केली. मात्र तेव्हाही दिलीप वळसे पाटील यांच्याकडे ती जबाबदारी सोपविण्यात आली. मी ऐकणार नाही, या भीतीपोटीच माझ्याकडे वरिष्ठांनी ही जबाबदारी दिली नसावी, असे अजित पवार यांनी सांगताच सभागृहात हशा पिकला.

पवार म्हणाले की, 'मला जे योग्य वाटते तेच मी नेहमी करतो. पक्षाचा कार्यकर्ता चुकीचा वागला, तर त्याला माफ केले जाणार नाही. सर्वांसाठी सारखाच नियम आहे. कार्यकर्त्यांवर अन्याय होत असेल तर मी त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहीन. मात्र, चुकीचे काम केले तर त्याला पाठीशी घातले जाणार नाही. राष्ट्रवादी काँग्रेस शहरातील हडपसर, वडगावशेरी, पर्वती आणि पुणे कँटोन्मेंट या चार विधानसभा मतदारसंघाचा आढावा अजित पवार यांनी यावेळी घेतला.'

## उत्तराखंडमध्ये तरुणीच्या हत्येचे संतप्त पडसाद

✔ सुराज्य/नवी दिल्ली : उत्तराखंडमधील हृषीकेश येथील कालव्यातून १९ वर्षीय अंकिता भंडारीचा मृतदेह सापडला होता. त्यानंतर काही तासांनी स्थानिक रहिवाशांनी अंकिता ज्या 'रिसॉर्ट'मध्ये कामाला होती, त्या 'रिसॉर्ट'ला आग लावली. अंकिताच्या खुनाचा आरोप असलेल्या पुलकित आर्य याच्या मालकीचे हे 'रिसॉर्ट' आहे. पुलकित हा उत्तराखंडचे भाजपचे माजी मंत्री विनोद आर्य यांचा मुलगा आहे. खुनाची घटना उघड झाल्यानंतर भाजपने विनोद आर्य यांची पक्षातून हकालपट्टी केली.

## ड्रोन उडवल्याने नाशिकमध्ये खळबळ

✔ सुराज्य/नाशिक : लष्कराच्या परिसरात अज्ञात ड्रोन उडवण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार नाशिकमध्ये घडला आहे. नववा मैल परिसरात संरक्षण, संशोधन आणि विकास संस्था म्हणजेच (डीआरडीओ) यांचे कार्यालय आहे. तिथे चौकी क्रमांक दोनजवळ संध्याकाळी सात वाजेच्या सुमारास अज्ञात ड्रोन उडताना दिसला. काही क्षणात हा ड्रोन तिथून निघून गेला. या प्रकारणी डीआरडीओच्या कर्मचाऱ्याने पोलिसांत फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञाताविरुद्ध आडगाव पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## 'सिडको'चा अधीक्षक अभियंता लाच घेताना सापडला

✔ सुराज्य/ठाणे: सिडकोच्या अधीक्षक अभियंत्यासह एका निवृत्त सहाय्यक कार्यकारी अभियंत्याला १५ हजार रुपयांच्या लाचप्रकरणी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) शुक्रवारी ताब्यात घेतले. अधीक्षक अभियंता प्रकाश मोहिले, निवृत्त सहाय्यक कार्यकारी अभियंता संजय डेकाटे अशी या अधिकाऱ्यांची नावे आहेत. त्यांच्याविरुद्ध खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

नवीन पनवेल येथील सिडको नोडल ार्यालयाच्या संरचनात्मक दुरुस्ती केलेल्या कामाच्या बिलाच्या मंजुरीसाठी आवश्यक इंटर्नल क्वालिटी ऑडिट रिपोर्टवर सही करण्यासाठी मोहिले यांनी उपकंत्राटदार (तक्रारदार) यांच्याकडे १५ हजार रुपयांची मागणी केली होती.

# ६ जिल्ह्यांचे पालकमंत्रीपद घेतल्यावरून अजित पवारांचा फडणवीसांना खोचक टोला

✔ सुराज्य/मुंबई

**महाराष्ट्रात एकनाथ शिंदे-देवेंद्र फडणवीस सरकार स्थापन झाल्यापासून राज्यातील जिल्ह्यांना पालकमंत्री कधी मिळणार? हा प्रश्न विरोधकांकडून सातत्याने विचारला जात होता. अखेर शनिवारी पालकमंत्र्यांची घोषणा झाली आहे. शिंदे-फडणवीस सरकारमधील विविध नेत्यांकडे पालकमंत्रीपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.**

पण देवेंद्र फडणवीस यांच्याकडे पालकमंत्री म्हणून सहा जिल्ह्यांची जबाबदारी देण्यात आली आहे. यावरून विधानसभा विरोधी पक्षनेते



अजित पवार यांनी देवेंद्र फडणवीसांना टोला लगावला आहे. माझ्याकडे पुणे जिल्ह्याचं पालकमंत्रीपद होतं, तर माझ्या नाकीनऊ आलं होतं, ते सहा जिल्ह्यांचा कारभार कसा सांभाळणार आहेत? असा सवाल अजित पवारांनी विचारला आहे. ते बारामतीत बारामती सहकारी बँकेच्या ६१ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलत होते.

यावेळी अजित पवार म्हणाले की, 'शिंदे-फडणवीस सरकारने पालकमंत्र्यांची घोषणा केली. काही जिल्ह्यांमध्ये एकच पालकमंत्री दिले आहेत. तर काही पालकमंत्र्यांकडे दोन जिल्हे दिले आहेत. माझ्या माहितीप्रमाणे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडे सहा जिल्हे देण्यात आले आहेत. माझ्याकडे पुण्याचं पालकमंत्रीपद होतं, तर माझ्या नाकीनऊ येत होतं.

आठवड्यातून किमान एक दिवस मला जिल्ह्यासाठी द्यावाच लागत होता. त्यामुळे ज्यांच्याकडे सहा-सहा जिल्हे दिले आहेत, ते त्यांना कसं पेलवणार आहे, हे मला माहीत नाही, परंतु त्यांना माझ्या शुभेच्छा, असं अजित पवार भाषणात म्हणाले आहेत.

# राष्ट्रवादी नव्हे, घराणेशाही पक्ष

## निर्मला सीतारमण यांची राष्ट्रवादी काँग्रेसवर टीका



✔ सुराज्य/मुंबई

**ज्यांच्या नावात राष्ट्रवादी आहे ते विकास कामात पक्षपातीपणा करत नाहीत. राष्ट्रवादी काँग्रेस घराणेशाहीचा पक्ष आहे. राष्ट्रवादीमध्ये घराणेशाहीचीच परंपरा आहे, त्यामुळे सामान्य नागरिकांची कामे होत नाहीत. घराणेशाहीमुळेच काँग्रेसची अवस्था बिकट झाली, हे लक्षात घ्यावे, अशा शब्दात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी राष्ट्रवादी काँग्रेसवर जोरदार टीका केली.**

राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला असलेल्या बारामती लोकसभा मतदार संघात विजय मिळविण्यासाठी भारतीय जनता पक्षाने बारामती मोहीम हाती घेतली आहे. त्याअंतर्गत सीतारामन बारामतीच्या दौऱ्यावर आल्या होत्या. रायबरेली, अमेठीतील घराणेशाहीबद्दल नागरिक काय म्हणातात हे पाहा, असे सांगत घराणेशाही आणि भ्रष्टाचाराविरोधात भाजपा उभे राहणार असल्याचे सीतारामन म्हणाल्या.

दौऱ्यादरम्यान सीतारामन यांनी बारामती शहर भाजपा कार्यालयाला भेट दिली. सहकार मेळाव्याबरोबरच नवमतदार, महिला मोर्चा, प्रमुख गावांनाही त्यांनी भेट दिली. बारामतीमध्ये भारतीय जनता पक्षाला सशक्त आणि मजबूत करण्याचा उद्देश आहे. २०२४ नंतरही बारामतीमध्ये सतत येणार, पक्ष ठरवेल तेंव्हा येणार असे सीतारामन यांनी जाहीर केले. सहकार मेळाव्यातही त्यांनी शरद पवार यांचे नाव न घेता टीका केली.

पंतप्रधान विरोधकांच्या जिल्ह्यातही प्रगतीच्या योजना पोहोचवित आहेत. बारामतीमध्ये एकाच ठिकाणी प्रगती झाली आहे. बारामतीमधील घराणेशाही संपविली तर बारामतीचा विकास होईल, असे सीतारामन यांनी सांगितले.

# इमारतींतील फ्लॅट मालकांचे हक्क संपुष्टात येण्याची भीती

✔ सुराज्य/ठाणे

किचकट आणि वेळखाऊ मानीव अभिहस्तांतरण (डीम्ड कन्व्हेयन्स) प्रक्रियेमुळे हजारो गृहनिर्माण सोसायट्यांचा पुनर्विकास रखडला आहे. त्यामुळे ही प्रक्रिया अधिक सुलभ आणि सुटसुटीत होण्यासाठी गृहनिर्माण कायद्यात होणाऱ्या प्रस्तावित सुधारणांमध्ये 'महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅट ॲक्ट' (मोफा) रद्द करण्याच्या हालचाली सुरू असल्याची माहिती मिळाली असून राज्यभरातील निबंधक कार्यालयांतून सहकार विभागाने एका परिपत्रकाद्वारे यासंदर्भात अहवाल




मागवला आहे. 'मोफा' रद्द करून नवा कायदा संमत झाल्यास इमारतींतील सदनिकाधारकांचे हक्क संपुष्टात येऊन त्यांना पुनर्विकासानंतर जमीन मालक अथवा बिल्डरकडून पुन्हा सदनिका विकत घ्यावी लागेल, अशी भीती गृहनिर्माण क्षेत्रातील जाणकारांनी व्यक्त केली. त्यामुळे रोगापेक्षा इलाज भयंकर असलेला हा नवा कायदा नको, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी घेतली आहे.

सन १९६०मध्ये सहकार कायदा झाला. त्यानंतर तीन वर्षांनी सन १९६३मध्ये महाराष्ट्र ओनरशिप फ्लॅट ॲक्ट (मोफा) लागू झाला. राज्यभरात एक लाख ३० हजार गृहनिर्माण सोसायट्या या 'मोफा' अंतर्गत नोंदणीकृत आहेत. बिल्डरांनी इमारत बांधल्यानंतर त्याखाली असलेला भूखंड सोसायटीच्या नावे करणे गरजेचे होते. परंतु बहुतेक बिल्डरांनी ते केले नाही. सोसायटीच्या पदाधिकाऱ्यांनीही याबाबत उदासीनता दाखवली.

# चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांना पदच्युत केले?

✔ सुराज्य/मुंबई

चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांना पदच्युत केल्याच्या अफवा इंटरनेटवर मुख्यत: सोशल मीडियावर पसरल्या आहेत. क्षी जिनपिंग समरकंदमध्ये शांघाय सहकार्य परिषदेसाठी (SCO) गेले असताना त्यांना कट रचून पदावरून हटवण्यात आल्याचे वृत्त सोशल मीडियामध्ये पसरले आहे.



या घटनेबाबत आंतरराष्ट्रीय माध्यमांनी अद्याप पुष्टी केलेली नाही. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयानेही या वृत्ताबाबत मौन बाळगले आहे. याबाबत चीनमधील माध्यमांनीही कुठलेही वृत्त प्रसारित केले नाही. मात्र, तरीही क्षी जिनपिंग यांना पदच्युत केल्याचा अफवा सोशल मीडियावर वेगाने पसरत आहेत. या अफवा क्षी जिनपिंग यांच्याविरोधात रचल्या गेलेल्या कटाचा भाग असल्याचा दावा काही संकेतस्थळांनी केला आहे. क्षी जिनपिंग यांना चीनच्या पीपल्स लिबरेशन आर्मी'मधून हटवण्यात आल्याचीही अफवा सोशल मीडियावर आहे.

## वनौषधींचे आगार संजीवन वनस्पती बेट; २५९ दुर्मीळ औषधी वनस्पती

✔ सुराज्य/लातूर: जिल्ह्यात वनसंपदा कमी असली, तरी एक आगळावेगळा वारसा प्राप्त आहे तो म्हणजे वनस्पती बेटाचा. नांदेड-लातूर रस्त्यावर वडवळ नागनाथ (ता. चाकूर)



येथून दोन किलोमीटर अंतरावर हिरवीगार टेकडी नजरेस पडते. या वनस्पतीच्या झाडांनी वेलांनी बहरलेली ही टेकडी अनेक वर्षांपासून संजीवनी वनस्पती बेट म्हणून प्रसिद्ध आहे.

समुद्र सपाटीपासून एक हजार फूट उंचीवर असलेल्या बेटाचा इतिहास एक हजार वर्षांपूर्वीच्या राजा विक्रमादित्य चालुक्याच्या राजवटीचा सांगितला जातो. विक्रमादित्यांनी संजीवनी बेटावरील औषधी वनस्पती जतन करण्यासाठी पहिला पाझर तलाव बांधल्याची नोंद लातूर जिल्हा दर्शनिकेत (गॅझेट) असल्याची माहिती आयुर्वेद वैद्य श्रीकांत कुलकर्णी सांगतात. संजीवनी औषधी वनस्पती बेटाचे खास वैशिष्ट्य आहे. या बेटावर २५९ दुर्मीळ औषधी वनस्पती आहेत. प्रामुख्याने मदनफळ, चित्रक, भुईकोहळा, वराहकंद, निर्मळी, भुताकेशी, शनमिर्या, रानकटोली, पाषाणभेद, पित्तपापडा, खडकशेपू, मालकांगोणी, अर्जुन सादडा, कोलमका आदींचा समावेश आहे.

# ९५ टक्क्यांहून अधिक पाणीसाठा

## राज्यातील सर्व मोठी धरणे भरली

✔ सुराज्य/पुणे

**राज्याच्या सर्वच भागांत सरासरीपेक्षा अधिक पाऊस झाल्याने हंगामाच्या अखेरच्या टप्प्यात राज्य पाणीदार झाले आहे. राज्यातील मोठ्या धरण प्रकल्पांत सध्या ९५ टक्क्यांहून अधिक पाणीसाठा जमा झाला आहे. या महिन्यात बहुतांश प्रकल्पांतून विसर्ग झाला असला, तरी सततच्या पावसाने पाणीसाठा कायम राहिला आहे. राज्यातील एकूण पाणीसाठा लक्षात घेता गतवर्षीच्या तुलनेत आठ टक्के पाणी अधिक असून, मुंबई परिसरासह कोकण आणि पश्चिम महाराष्ट्राच्या पुणे विभागातील जवळपास सर्वच धरणे काठोकाठ भरली आहेत.**

नाशिक, अमरावती विभागातही मोठा पाणीसाठा आहे. राज्यात सध्या सरासरीच्या तुलनेत सुमारे २५ टक्के अधिक पावसाची नोंद झाली आहे. सर्वच जिल्ह्यांत पाऊस सरासरीच्या पुढे झाला आहे. जुलै आणि ऑगस्ट महिन्यात राज्यात सर्वाधिक पावसाची नोंद झाली. याच कालावधीत राज्यातील धरणांमध्ये समाधानकारक पाणीसाठा जमा झाला होता. ऑगस्टच्या शेवटी राज्यातील १४१ मोठ्या धरणांमधील पाणीसाठा ९० टक्क्यांवर पोहोचला होता. सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापासून पुन्हा विविध भागांत पावसाने जोर धरल्याने या कालावधीत

## राज्यात सध्या पाऊस अंतिम टप्प्यात

मोठ्या प्रकल्पांतील विभागनिहाय

| पाणी विभाग | सध्या | गतवर्षी |
|---|---|---|
| अमरावती | ९५.६१ टक्के | ९५.३५ टक्के |
| औरंगाबाद | ९२.३२ टक्के | ८४.०३ टक्के |
| कोकण | ९८.०५ टक्के | ९८.५३ टक्के |
| नागपूर | ८८.३४ टक्के | ८०.८८ टक्के |
| नाशिक | ९६.६९ टक्के | ८९.७१ टक्के |
| पुणे | ९८.३४ टक्के | ९४.४५ टक्के |

पाणीसाठ्यात आणखी पाच टक्क्यांची भर पडली आहे. या कालावधीत उजनी, कोयना, जायकवाडी आदी राज्यातील महत्त्वाच्या प्रकल्पांमधून पाण्याचा मोठ्या प्रमाणावर विसर्ग झाला असला, तरी पावसामुळे पाणीसाठा कायम राहिला आहे. राज्यातील मोठ्या प्रकल्पांमध्ये सध्या ९५.७५ टक्के पाणीसाठा जमा झाला आहे. गतवर्षीच्या तुलनेत तो ५ टक्क्यांनी अधिक आहे.

मोठ्या प्रकल्पांसह राज्यातील मध्यम २५८ आणि लघु मध्यम २८६८ प्रकल्पांमध्ये मिळून ९० टक्क्यांच्या आसपास पाणीसाठा आहे. गतवर्षीच्या तुलनेत हा साठा सुमारे ८ टक्क्यांनी अधिक आहे. सध्या सर्वाधिक पाणीसाठा कोकण विभागामध्ये ९३ टक्के इतका आहे. त्याखालोखाल पुणे विभागात ९२ टक्के पाणी जमा झाले आहे.



### हलक्या सरींचा अंदाज

सध्या राज्यात बहुतांश भागात पावसाने विश्रांती घेतली आहे. पुढील तीन दिवसांनंतर विदर्भ, मराठवाड्यात हलक्या सरींचा अंदाज आहे. शेवटच्या टप्प्यातही पाऊस होऊ शकतो. त्यामुळे पाणीसाठ्यात आणखी भर अपेक्षित आहे.

सततच्या विसर्गानंतरही उजनी १०० टक्के राज्यातील सर्वात मोठी आणि महत्त्वाची धरणे असलेले कोयना, उजनी आणि जायकवाडी प्रकल्प गेल्या अनेक दिवसांपासून काठोकाठ भरली आहेत. या तीनही धरणांतून मोठ्या प्रमाणावर विसर्ग करण्यात आला. कोयना धरणात सध्या ९९ टक्क्यांहून अधिक पाणीसाठा आहे. जायकवाडी धरणात ९८ टक्के पाणी आहे. उजनी धरणामध्ये १०० टक्के पाणी आहे.

CMYK

# नव्या पालकमंत्र्यांच्या स्वागताला नाराजीच्या पायघड्या

## ■ सोलापूर जिल्ह्याला चौथा गेटकेन पार्सल संपर्कमंत्री
## ■ राज्य पातळीवर सोलापूरला गृहीत धरून कारभार
## ■ भूमिपुत्र जिल्ह्याचा पालकमंत्री कधी होणार?

**सुराज्य/विशेष प्रतिनिधी**

मुख्य राज्यासह केंद्रात देखील राजकीय नेतृत्वाचा ठसा उमटवेल्या सोलापूर जिल्ह्याला गृहीत धरून कारभार सुरू असून या जिल्ह्यावर अहमदनगर स्थित मंत्री राधाकृष्ण विखे - पाटील या गेटकेन पालकमंत्र्याला आणून बसवण्यात आले असताना नव्या पालकमंत्र्यांच्या स्वागतला नाराजीच्या पायघड्या आहेत.

विशेषत्वे, गेटकेन पालकमंत्र्यावरून जिल्ह्यात पुन्हा नाराजीचा सूर उमटला आहे. राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंबकल्याणमंत्री प्रा. डॉ. तानाजी सावंत हे सोलापूर जिल्ह्यातील आहेत. त्यांच्याकडे पालकमंत्रीपद सोपवणे क्रमप्राप्त होते, असाही सूर सोलापूरच्या राजकीय क्षेत्रात उमटत आहे.

शिंदे गट प्रणीत शिवसेना व भाजप युतीच्या सरकारमधील पालकमंत्रीपदच्या मागच्या साधारण दीड महिन्यांपासून रखडलेल्या प्रक्रियेचा निर्णय शनिवारी मार्गी लावण्यात आला. पालकमंत्रीपदांच्या नियुक्त्या करण्यात आल्या.

अहमदनगर जिल्ह्याचे राजकीय प्रतिनिधित्व करीत असलेल्या राधाकृष्ण विखे -पाटलांवर सोलापूर जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांच्या या निवडीवरून सोलापूर जिल्ह्यात नाराजी पसरली आहे. विखे - पाटील यांना या जिल्ह्याची कोणतीही पार्श्वभूमी माहीत नसताना त्यांची यापदी नियुक्ती केल्याने त्यांच्या या जिल्ह्याला पालकमंत्री म्हणून काय न्याय मिळणार असा सवाल उपस्थित केला जात आहे.



राज्यातील सत्तांतरापूर्वी महाविकास आघाडी सरकार असताना देखील जिल्ह्यातील कोणत्याच आमदाराकडे जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी सोपविण्यात आलेली नव्हती. या पदाला लायक असणारा एकही आमदार सोलापूर जिल्ह्यात नव्हता का? असा संतापजनक सवाल त्यावेळीही वारंवार उपस्थित केला जात होता.

महाविकास आघाडी सरकारमध्ये सहयोगी पक्ष असलेल्या राष्ट्रवादीकडून दिलीप वळसे - पाटील, जितेंद्र आव्हाड तसेच दत्तात्रय भरणे यांना सोलापूर जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाच्या सिंहासनावर आणून बसविण्यात आले. हे सगळे पालकमंत्री जिल्ह्यासाठी गेटकेन पार्सलच होते. दरम्यान गेटकेन पार्सलच कित्ता राज्यातील सध्याच्या शिंदे गट शिवसेना आणि भाजप युती सरकारने गिरवला आहे. सोलापूर जिल्ह्यासाठी या जिल्ह्याचा स्थानिक आमदार पालकमंत्री न करता परजिल्ह्यातील आमदार इथे पालकमंत्री म्हणून बसविण्यात आला आहे.

### दगडापेक्षा वीट मऊ...

राधाकृष्ण विखे - पाटील यांना सोलापूर जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदावर आणून कोणता हेतू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी साध्य केला याचा अंदाज कोण्याच राजकीय विश्लेषकांना लागेना झाला आहे. फडणवीस यांना उपमुख्यमंत्री व एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करण्याचा आश्चर्यकारक धक्का दिल्लीस्थित भाजपवाल्यांनी दिला. त्याप्रमाणे सोलापूर जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदावर विखे पाटील यांची नियुक्ती करण्याचा वेगळा धक्का वा राजकारण आहे का? याचीही पडताळणी केली जात आहे. पण सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातले प्रा. सावंत हे सोलापूर जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदासाठी चालले असते, कारण ते या जिल्ह्याचे भूमिपुत्र तरी आहेत. उस्मानाबादसह सोलापूर जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली असती तरी सोलापूर जिल्ह्यात संताप व्यक्त केला गेला नसता. दगडापेक्षा वीट मऊ असे जिल्ह्याने मानले असते.

### आता कोणता नवा चमत्कार?

सोलापूर जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदावर आणून बसवलेल्या इंदापूरचे गेटकेन पार्सल दत्तात्रय भरणे यांनी मोठा चमत्कार घडविला. इंदापूर आणि बारामती तालुक्यातील गावांसाठी उजनीतून पाणी पळविण्याचा तो चमत्कार. अशात आता राधाकृष्ण विखे - पाटील हे सोलापूर जिल्ह्याचे अहमदनगरला काय नेण्याचा चमत्कार दाखवतात ? हे येणारा काळच सांगेल.

### निर्णयाकडं लक्ष ते कायमच...

राज्यातील विद्यमान सरकारच्या मंत्रिमंडळाचा विस्तार पुढील महिन्यात होणार आहे म्हणे. त्यात सोलापूर जिल्ह्यातील कोणत्या चेहऱ्यांचा समावेश होणार ? जिल्ह्यात कोणत्या तालुक्याकडे लाल दिवा जाणार याबद्दलचे प्रचंड औत्सुक्य आहे. राज्यात सत्तांतर झाल्यापासून जिल्ह्यात कोणाला लाल दिवा मिळणार? ते आता पुढील महिन्यात होणाऱ्या मंत्रिमंडळाच्या विस्तारापर्यंत कायम राहील.

### सावंत का नको?

फडणवीस यांच्यासारख्या मंत्र्यांकडे तब्बल सहा सहा जिल्ह्यांचे पालकमंत्रीपद ठेवले गेले. अन्य काही मंत्र्यांकडंदेखील अधिक जिल्ह्यांची पालकमंत्रीपदे दिली गेली आहेत. असे असताना उस्मानाबाद जिल्ह्याबरोबरच सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्रीपद सावंत यांना का दिले गेले नाही? सोलापूर जिल्ह्याच्या दृष्टीने अनभिज्ञ असलेले राधाकृष्ण विखे - पाटील यांनाच का या जिल्ह्याचे पालकमंत्रीपद दिले गेले. सावंत का नको होते?

## बसमधून मोबाईल चोरले; तरुणावर गुन्हा

**सुराज्य/सोलापूर** : चिंकहिल (ता.माढा) येथे बस मधून दोघांचे मोबाईल चोरल्याप्रकरणी अमीर साहेबू पठाण (वय २५ रा.नाळे प्लॉट बार्शी)याच्याविरुद्ध कुर्डवाडीच्या पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास नागनाथ बिराजदार (रा.औसा जि.लातूर) आणि त्यांचा मित्र अर्जुन कणेकर हे दोघे शिरशी ते पुणे या बस मधून प्रवास करीत होते. दोघांना झोप लागल्यानंतर पठाण याने त्यांचे १४ हजार रुपये किमतीचे मोबाईल पळविले. अशी नोंद पोलिसात झाली आहे.




## भोसले बंधूच्या 'हॉटेल शिवानी'चा आज शुभारंभ

**सुराज्य/सोलापूर**

उत्तर सोलापूर तालुक्यातील कोंडी गावातील भोसले परिवाराच्या वतीने नव्याने उभारण्यात आलेल्या हॉटेल शिवानीचा शुभारंभ आज मोठ्या धुमधडक्यतात अनेक मान्यवरांच्या उपस्थित होणार आहे. या शुभारंभास उपस्थित राहण्याचे आग्राहाचे निमंत्रण बालजी केरबा भोसले आणि समस्त भोसले परिवाराच्या वतीने दिले आहे.

भोसले परिवार यांचा मुळ हॉटेलचा व्यवसायात आहेत मात्र नव्या प्रशस्त जागेत भोसले परिवाराच्या वतीने भव्य दिव्य असे हॉटेल शिवानी उभे केले आहे. शाकाहारी मासाहरी जेवणासह राहण्याची उत्तम सोय हॉटेल शिवानी मध्ये आहे. घटस्थापनेच्या शुभमुहूर्तावर या हॉटेलचा शुभारंभ केला जाणार सोमवार २६ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता शिवसेना नेते सोलापूर कृषीउत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रकाश वानकर यांच्या हस्ते युवानेते बाळराजे पाटील, जिर्तेंद्र साठे, गणेश वानकर, आनंद चंदनशिवे दिपक गायकवाड, नाना काळे यांच्या प्रमुख उपस्थित केले जाणार आहे. यावेळी भारत पाटील, कोंडीचे सरपंच सुरेश राठोड, उपसरपंच किसन भोसले, पोलिस पाटील मधुकर पाटील , सदस्य विशाल भोसले, सोमानाथ राऊत, प्रसाद निळ, आबासाहेब राऊत, वसंत भोसले, दत्तात्रय भोसले नवनाथ जाधव, राजेंद्र घाटे उपस्थित राहणार आहेत तरी कार्यक्रमास येण्याचे आवाहन भोसले परिवाराच्या वतीने केले आहे.

## गळफास घेतलेल्या विवाहितेचा उपचारादरम्यान मृत्यू



**सुराज्य/सोलापूर** : पती बरोबर भांडण झाल्याच्या कारणावरून राहत्या घरात गळफास घेतलेली मानसी प्रमोद भंडारे (वय २५ रा. मरवडे ता.मंगळवेढा) ही सोलापुरातील शासकीय रुग्णालयात उपचार घेताना आज रविवारी सकाळी मरण पावली.

ती मंगळवारी (२० सप्टेंबर) रोजी दुपारच्या सुमारास पति बरोबर भांडण झाल्याने छतावरील लोखंडी अँगलला साडीने गळफास घेतली होती. तिला फासातून सोडवून मंगळवेढा येथे प्राथमिक उपचार करण्यात आले होते. त्यानंतर तिला अश्विन शिवशरण (काका) यांनी सोलापुरातील शासकीय रुग्णालयात दाखल केले होते. अशी नोंद तालुका पोलिसात झाली आहे.

